समता पतसंस्था
टेन्शन नाही, रिटर्न्स निवडा!
ठेवींवर मिळवा १०% पर्यंतचे व्याज
*नियम व अटी लागू
अहिल्यानगर : मार्केट यार्ड | प्रेमदान चौक | दिल्लीगेट
संपर्क : ७७२२ ०७० २२२
www.samatapat.com

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. २०.०३.२०२६ | अंक नं. २९० | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

संत राजिन्दर सिंह जी महाराज
यांच्या पावन सानिध्यात
मंगळवार, मार्च, 31/2026
संगत दर्शन - सायं 7 वाजता
बुधवार, एप्रिल, 1/2026
सत्संग - सायं 7 वाजता
नामदान (दिक्षा) - रात्री 9 वाजता
मिस्कीन मळा, गंगा उद्यान शेजारी, मिस्कीन नगर, सावेडी, अहिल्यानगर - 414003
7071050505/9067894213
www.sos.org

स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
१०१ भाग्यवंत जोडप्यांना चक्क FREE हनिमून टूर
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी.
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹888/-*
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
Conditions Apply*

# वाढत्या वीज भारनियमनाविरोधात ‘महावितरण कार्यालया’वर ‘मोर्चा’

## कामकाजात सुधारणा करा अन्यथा ठिय्या आंदोलन करणार : खासदार निलेश लंके

नगर – महावितरणने ग्रामीण भागात लोडशेडिंग सुरु केले आहे. हे लोडशेडिंग सायंकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत असते. त्यामुळे ग्रामीण भाग पूर्णपणे अंधारात बुडत आहे. सध्या परीक्षा सुरु आहेत. वीज नसल्यामुळे विद्यार्थ्यांना रात्री अभ्यास करता येत नाही. तसेच सर्वत्र अंधार असल्यामुळे बिबट्यांच्या हल्ल्यांचा धोकाही वाढला आहे. त्यामुळे अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदारसंघात सुरू असलेल्या सिंगल फेज वीज लोडशेडिंगची वेळ तातडीने बदलावी, अशी मागणी खासदार निलेश लंके यांनी केली.

खा. लंके यांनी या मागणीसाठी २० मार्च रोजी महावितरण कार्यालयावर मोर्चा काढून महावितरणचे अधीक्षक अभियंता रमेशकुमार पवार यांना या मागणीचे निवेदन दिले. यावेळी नाशिक विभागाचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे त्यांच्याशीही खा. लंके यांनी चर्चा केली. या चर्चेत लटपटे यांनी सुधारणा करण्याचे आश्वासन खा. लंके यांना दिले.

मोर्चाला संबोधित करताना खा. लंके यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप केले. ते म्हणाले, महावितरणमधील काही अधिकारी विशिष्ट पक्षाचे कार्यकर्ते

*(मजकूर व छायाचित्र पान २ वर)*

E.T.N.
अहिल्यानगरमधील एकमेव भव्य फर्निचर मॉल
अवतार होम डेकोर
Decorate your Dreams.....
Flat 20% Discount Offer
सर्व प्रकारचे एक्सक्लुसिव सोफा सेट्स • रिक्लायनर चेयर्स • बेडरुम सेट्स • सागवान वुडन फर्निचर्स • होम डेकोर आयटम्स
• फॅन्सी इम्पोर्टेड 4, 6, व 8 सीटर्स डायनिंग टेबल्स-चेयर्स सेट्स • मंदिर • स्टील कपाट • गार्डन झोपाळा • टेबल चेयर सेट्स
• ऑफिस टेबल्स-चेयर्स • तसेच विविध प्रकारच्या अत्याधुनिक, आकर्षक इंडियन व इंपोर्टेड फर्निचरची भरपूर व्हरायटीज्!
सर्व प्रकारचे होलसेल-रिटेल सोफा व मॅट्रेसेस उपलब्ध * फोम, हार्डवेअर आणि फॅब्रिक्ससाठी सर्वोत्तम पर्याय
गजराजनगर फाटा, गणेश मंदिरासमोर, छ.संभाजीनगर रोड, पोखर्डी, अहिल्यानगर
9225328344 / 9405011196 (पाण्डेय जी) / 8262927034

एक अगरबत्तीचा सुवास दरवळेल दूरवर....
प्रिमियम मसाला अगरबत्ती
इंडियन कस्तुरी
Indian Kasturi
तसेच केसरचंदन, शाहीऊद, हिना कस्तुरी, महालक्ष्मी, कस्तुरी 'दम अगरबत्ती व धुप
शुभलाभ (६ इन १ पाकिट १२० ग्रॅम रु.६५ऐवजी ५० मध्ये
तसेच शेंदूर, कापूर, कापूरकोन, डिओ स्प्रे, लाकडी स्टॅंड
व अगरबत्ती होलसेल व रिटेल साठी
केवळ अगरबत्ती
हॉटेल रसरंग समोर, आडते बाजार, अ.नगर.
खास उन्हाळ्यासाठी कुलर परफ्युम उपलब्ध

फ्लेक्स प्रिंटींग
9403232323

महेंद्र पेडावाला
रजवाडी गुजराती थाळी
पार्सल सुविधा उपलब्ध..
रेल्वे पार्सल, किटी पार्टी व बर्थडे पार्टीसाठी खास सोय
कापड बाजार, अहिल्यानगर.
स्पेशल आमरस 400/- किलो

ROYAL WOODS
KPGC VENTURES PVT LTD
घराकडे पाहत गुढी तथास्तु म्हणेल, हा मुहूर्त आयुष्यभरासाठी शुभ ठरेल!
हा पाडवा साजरा करा, तुमच्या नव्या घरी.
आपल्याला व आपल्या परिवाराला, गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा.
2BHK 1346sq.ft.
3BHK 1725sq.ft.
• दर्जेदार प्रीमियम घरे
• डी-मार्टपासून फक्त ३५० मीटर अंतरावर
• एसी जिम, जॉगिंग/वॉकिंग ट्रॅक, किचन ट्रॉलीजसह २५+ सुविधा
9272119270
PLOT NO. 26/5, ANURON 7 ROAD, BEHIND DMART, NANDANVAN NAGAR AHILYANAGAR, 414003
ROYAL WOODS BY KPGC VENTURES PVT. LTD
*T&C Apply | Artistic Impressions

भावपूर्ण श्रध्दांजली



स्व. ब्रिजमोहन बक्षी
स्व. दि. १७/०३/२०२६

संस्कार, स्नेह, सहानुभूती
या तत्वातुन घडली,
आपल्या जीवनाची अमृतगाथा..
प्रेरणा देत राहतील आपल्या
स्मृती आम्हां सदैव आता...

आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली!

* शोकाकूल *
निखिल लुनिया । महेश मुनोत । नितीन बोरा
आदित्य इंदाणी । जितेंद्र गुगळे । मनिष मुनोत । मोहित मुनोत
अजय मुथियान । राघवेंद्र बिहाणी । विजय देवकर
कमलेश मुनोत । संतोष मुथा । पै.सुनिल झिरपे
उद्योजक ग्रुप, एमआयडीसी.अहिल्यानगर

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँड मार्बल इंडस्ट्रिज

बाळ आजारी आहे का?
ते वारंवार आजारी असणे
नेहमी सर्दी, खोकला
वारंवार होणारा बाल दमा
वारंवार जुलाब होणे
प्रतिकारशक्ती कमी असणे
वजन, उंची कमी
या तक्रारींवर खात्रीशीर सामाजिक जाणिवेतून मोफत सल्ला व शिबिर
* सर्व आजारांसाठी ॲडमिट सुविधा उपलब्ध.
* सर्व नामांकित कंपन्यांची कॅशलेस सुविधा उपलब्ध.
अक्षय मुलांचे हॉस्पिटल
डॉ.अनिरुद्ध गिते
MBBS / MD paeds
बालिकाश्रम रोड, अ.नगर
संपर्क : मो.९५११११०४४४

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# कंत्राटदाराला भररस्त्यात अडवून सोन्याची चेन हिसकावली

**कोठला परिसरातील घटना, ३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल**

नगर – शहरात चोऱ्यांचे सत्र सुरूच असून, कोठला परिसरात भरदिवसा एका कंत्राटदाराला अडवून त्यांच्या गळ्यातील ४० हजार रुपये किमतीची सोन्याची चेन हिसकावून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

याबाबत पोपट भाऊसाहेब जाधव (रा.निर्मलनगर, पाइपलाइन रोड) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी जाधव हे १८ मार्च रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास कोठला परिसरातून कारने जात होते. यावेळी दुचाकीवरून आलेल्या तीन अनोळखी आरोपींनी जाधव यांची कार अडवली. तुमच्या कारचा आमच्या दुचाकीला कट का लागला? असा बहाणा करून या तरुणांनी जाधव यांच्याशी हुज्जत घालण्यास सुरुवात केली. गोंधळाचा फायदा घेत आरोपींनी जाधव यांच्या गळ्यातील एक तोळा वजनाची सोन्याची चेन बळजबरीने तोडून पोबारा केला.

घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे आणि पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांनी घटनास्थळी भेट देऊन तपासाच्या सूचना दिल्या आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर करत आहेत. पोलिसांनी आरोपींचा शोध घेण्यासाठी परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासण्यास सुरुवात केली आहे.

# राहुरीच्या विधानसभा पोटनिवडणूक खर्चाची काटेकोरपणे तपासणी करा

**खर्चाची मर्यादा ४० लाख रुपये; सर्व पथकांच्या वाहनांवर जीपीएस यंत्रणा; दैनंदिन अहवाल वेळेत सादर करा : जिल्हाधिकारी**

नगर – आगामी पोट निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक खर्चाची काटेकोरपणे तपासणी करण्यासाठी निवडणूक आयोगाच्या सूचनांच्या प्रभावी अंमलबजावणी करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिली.


पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक खर्चाची काटेकोरपणे तपासणी करण्यासाठी आयोगाच्या सूचनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आयोजित बैठकीत सूचना देताना जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया.

जिल्हाधिकारी कार्यालयात राहुरी विधानसभा मतदारसंघातील निवडणूक खर्च निरीक्षक व्ही. कुमार यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते. यावेळी अपर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी दत्तात्रय कवितके, जिल्हा परिषदेचे मुख्य वित्त व लेखा अधिकारी शैलेश मोरे व विविध विभागांचे अधिकारी आदी उपस्थित होते.

निवडणुकीच्या अनुषंगाने स्थापन करण्यात आलेली सर्व भरारी पथके, स्थिर सर्वेक्षण पथके व नियंत्रण कक्षांनी कार्यान्वित करण्यात आले असून या सर्व पथकांनी दैनंदिन अहवाल वेळेत सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिले.

खर्च निरीक्षक व्ही. कुमार म्हणाले, भारत निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार नियमित निवडणूक व पोटनिवडणूक यात कोणताही भेद नसून सर्व नियमांचे काटेकोर पालन होणे आवश्यक आहे. बँकांमधील संशयास्पद व्यवहारांची माहिती थेट प्राप्तिकर विभागाला कळवावी. राज्य उत्पादन शुल्क व पोलीस विभागाने अवैध मद्य व पैशांच्या वाहतुकीवर कारवाई करावी. स्थिर सर्वेक्षण पथकांनी तपासणी नाक्यांवर चोख बंदोबस्त ठेवावा. तसेच सर्व पथकांच्या वाहनांवर जीपीएस यंत्रणा कार्यान्वित करावी व त्यांच्या जागा अद्ययावत कराव्यात.

व्हिडिओ सर्वेक्षण पथकाने राजकीय सभांचे चित्रीकरण करताना मंचाचा आकार, खुर्च्यांची संख्या व इतर व्यवस्थेची सविस्तर नोंद घ्यावी जेणेकरून खर्चाचा अचूक अंदाज बांधता येईल. समाजमाध्यमांवरील प्रचारावरदेखील विशेष लक्ष ठेवावे व उमेदवारांच्या खर्चाची मर्यादा चाळीस लाख रुपये असल्याने खर्चाच्या नोंदी अद्ययावत ठेवाव्यात. उमेदवारांची गुन्हेगारी पार्श्वभूमी असल्यास ती वृत्तपत्रांत प्रसिद्ध करण्याबाबत कार्यवाही करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

सी–व्हिजिल प्रणालीवर येणाऱ्या तक्रारींचे तातडीने निवारण करावे, असे स्पष्ट करत सर्व पथकांनी समन्वयाने काम करून पारदर्शकपणे निवडणूक प्रक्रिया पार पाडावी, असे आवाहनही या बैठकीत करण्यात आले.

# राहुरी पोटनिवडणुकीसाठी तीन निरीक्षक दाखल

राहुरी विधानसभा पोटनिवडणूक २०२६ करिता भारत निवडणूक आयोगाने नियुक्त केलेले जनरल, खर्च व पोलीस निरीक्षक १८ मार्च रोजी जिल्ह्यात दाखल झाले असून त्यांनी निवडणूक कामकाजाला सुरुवात केली आहे. नागरिकांच्या माहितीसाठी या निरीक्षकांचा तपशील प्रशासनामार्फत जाहीर करण्यात आला आहे.

राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या विश्रामगृहात जनरल निरीक्षक देवानंद रियांग व खर्च निरीक्षक व्ही.ए.टी. व्ही. कुमार दाखल झाले आहेत. नागरिकांना जनरल निरीक्षकांशी ९२०९५१६९९४ व खर्च निरीक्षकांशी ९२०९६०१८३९ या क्रमांकांवर संपर्क साधता येणार आहे. तसेच पोलीस निरीक्षक रितुराज रवी हे अहिल्यानगर येथील शासकीय विश्रामगृहात दाखल झाले असून त्यांनी कायदा व सुव्यवस्था विषयक कामकाज सुरू केले आहे. त्यांचा संपर्क क्रमांक ९२०९६०३३८६ असा आहे.

या निरीक्षकांसाठी प्रशासनामार्फत संपर्क अधिकारी, लघुलेखक, लिपिक, पोलीस गार्ड, वाहन व शिपाई आदी व्यवस्था करण्यात आली आहे. नियुक्त संपर्क अधिकारी निरीक्षकांच्या सातत्याने संपर्कात असून संपूर्ण निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी प्रशासन दक्षता घेत आहे.

# ‘इनोव्हा’ मधून गोवंशीय जनावरांची वाहतूक

**केडगाव बायपासला गोरक्षक व पोलिसांनी ४ जनावरांची केली सुटका**

नगर – गोवंशीय जनावरांची कत्तलीसाठी टोयाटो कंपनीच्या इनोव्हा कार मधून वाहतूक केली जात असल्याचे समोर आले आहे. गोरक्षकांनी २० मार्च रोजी पहाटे २.३० च्या सुमारास केडगाव बायपास चौक परिसरात या कारचा पाठलाग करून कोतवाली पोलिसांच्या मदतीने ४ गोवंशीय जनावरांची सुटका केली असून कार चालकाला ताब्यात घेत त्याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.


केडगाव बायपास चौकात कत्तलीसाठी चालवलेली जनावरे पकडल्यानंतर त्यांची गोशाळेत रवानगी करण्यासाठी त्यांना वाहनात घालताना कोतवाली पोलिस.

याबाबत गोरक्षक रोहन कानिफनाथ जगताप (वय २१, रा. रामवाडी, सर्जेपुरा) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी जगताप यांच्या सह शेरा सुरेश शर्मा, जय आदिनाथ गिरी हे केडगाव बायपास येथील आदेश हॉटेल समोर थांबलेले असताना पहाटे २.३० च्या सुमारास त्यांना एक इनोव्हा कार पुण्याकडून नगरच्या दिशेने येत असल्याचे दिसले. या कारमध्ये गोवंशीय जनावरांची कत्तलीसाठी वाहतूक केली जात असल्याचा संशय त्यांना आला. त्यांनी लगेच डायल ११२ वर कॉल करून पोलिसांना माहिती दिली आणि मोपेड वर कारचा पाठलाग सुरु केला. काही अंतर पुढे गेल्यावर कारचालकाने कार रोड वरून रोड च्या बाजूच्या खड्ड्यात घेवून गेला.

गोरक्षकांनी तेथे जवळ जावून पाहिले असता त्यांना कार मध्ये ४ गोवंशीय जनावरे दिसली. तसेच वाहन चालक जखमी झालेला दिसला. त्यांनी त्याला कारच्या बाहेर काढून बसवले. त्याला नाव विचारल्यावर त्याने शहानुर रहेमान सय्यद (वय ३३, रा. घासगल्ली कोठला) असे सांगितले. काही वेळात कोतवाली पोलिसांचे पथक तेथे आले. त्यांनी वाहनचालक, इनोव्हा कार आणि जनावरे ताब्यात घेवून पोलिस ठाण्यात आणले. रोहन जगताप यांच्या फिर्यादी वरून कारचालक सय्यद याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ताब्यात घेतलेल्या जनावरांची गोशाळेत रवानगी करण्यात आली आहे.

# गोवंशीय जनावरांची वाहतूक करणाऱ्या दोघांना पकडले



नगर – नगर दौंड रोडवर बाबुर्डी बेंद फाटा येथे गोवंशीय जनावरांची कत्तलीसाठी वाहतूक करणाऱ्या दोघांना पकडण्यात आले असून त्यांच्या ताब्यातून ३ जनावरांची सुटका करण्यात आली आहे. गोरक्षक आणि नगर तालुका पोलिसांनी ही संयुक्त कारवाई केली आहे.

अरबाज नासीर पठाण (वय २६, रा.वाळकी, ता.नगर) व ड्रायव्हर विजय विठ्ठल मोहिते (वय ४०, रा. शहापूर, ता.नगर) अशी पकडण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. हे आरोपी कत्तलीसाठी एक खिल्लार जातीचे देशी गोवंश, एक देशी नंदी आणि एक एचएफ जातीची कालवड बेकायदेशीररीत्या वाहतूक करत होते. मात्र, गोरक्षकांच्या सतर्कतेमुळे हा संपूर्ण प्रकार उघडकीस आला. गोरक्षक आणि मानद पशुकल्याण अधिकारी चांगदेव गोरख भालसिंग हे त्यांचे मित्र ओम महेश दोंता व अजय नाथा शेळके हे तिघे नगर दौंड रोड वर बाबुर्डी फाटा येथे थांबलेले असताना त्यांना एका मालवाहू वाहनात जनावरे नेली जात असल्याचे दिसून आले.

त्यांनी त्या वाहनाला थांबवले व चालक विजय मोहिते याच्या कडे विचारणा केली असता ही जनावरे अरबाज पठाण याच्या सांगण्यावरून कत्तलीसाठी नेत असल्याचे त्याने सांगितले. त्यामुळे भालसिंग यांनी लगेच डायल ११२ ला कॉल करून पोलिसांना माहिती दिली. नगर तालुका पोलिसांचे पथक तेथे पोहचेपर्यंत चालक मोहिते याने गोरक्षकांची नजर चुकवून वाहन घेवून वाळकीकडे पसार झाला. नगर तालुका पोलिसांच्या पथकाने वाळकी परिसरात त्याचा शोध घेत दोन्ही आरोपींना जनावरे व वाहनासह ताब्यात घेतले. या प्रकरणी चांगदेव भालसिंग यांच्या फिर्यादी वरून दोघांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सदरची कारवाई स.पो.नि. गणेश वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक जयेश गांगुर्डे, सहायक फौजदार दत्तात्रय हिंगडे सहाय्यक फौजदार बाबासाहेब गुंजाळ, पोलीस हवालदार मंगेश खरमाळे, पोलीस कॉन्स्टेबल विक्रांत भालसिंग यांनी केली.


ग्रामीण भागातील भारनियमनाच्या वेळेत बदल करण्याच्या मागणीसाठी खा. निलेश लंके यांनी येथील महावितरण कार्यालयावर मोर्चा काढून निवेदन दिले. (छाया – लहू दळवी)

# भारनियमनाविरोधात ‘महावितरण कार्यालया’वर ‘मोर्चा’

*(पान १ वरुन)*

असल्यासारखे काम करीत आहेत. त्यांना ‘वरुन फोन’, ‘आदेश’ आले तरच ते कामे करतात. राजकीय नेत्यांच्या फार्म हाऊसला २४ तास वीज मिळते. पण शेतकऱ्यांची वीज तोडली जाते. वीज बिल भरुनही शेतकऱ्यांना वीज मिळत नाही, अशी परिस्थिती आहे. ग्रामीण भागात सर्वत्र सिंगल फेज योजना पोहोचलेली नाही. त्यामुळे ग्रामीण भागात सर्वत्र सिंगल फेज वीज चालू करावी. सध्या सुरु असलेल्या भारनियमनाची वेळ बदलावी अन्यथा महावितरण कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करु, असा इशारा खा. लंके यांनी दिला.

खा. लंके यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, नगर, पारनेर, श्रीगोंदा, राहुरी, जामखेड, कर्जत, शेवगाव व पाथर्डी या भागांत सध्या सायंकाळी ६ ते रात्री १० या वेळेत सिंगल फेज वीज लोडशेडिंग करण्यात येत आहे. ही वेळ शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची असून याच कालावधीत पिकांना पाणी देणे व इतर शेतीची कामे केली जातात. मात्र, वीजपुरवठा खंडित होत असल्यामुळे शेतीच्या कामांमध्ये अडथळे निर्माण होत आहेत. याशिवाय, परिसरात बिबट्याचा वावर तसेच चोऱ्या–दरोड्यांच्या घटनांची भीती असल्यामुळे संध्याकाळच्या वेळेत नागरिकांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न गंभीर बनला आहे. दरम्यान, सध्या शालेय परीक्षा सुरू असल्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी आवश्यक वीजपुरवठा उपलब्ध होत नसल्याने त्यांच्या शिक्षणावरही परिणाम होत आहे. या पार्श्वभूमीवर सायंकाळी ६ ते रात्री १० या वेळेत होणाऱ्या लोडशेडिंगमध्ये तातडीने बदल करून पर्यायी वेळ निश्चित करावी, अशी मागणी खासदार निलेश लंके यांनी केली आहे.

या निवेदनावर बाळासाहेब हराळ, प्रा. सिताराम काकडे, रामेश्वर निमसे, श्रीकांत जगदाळे, प्रा. अमोल खाडे, पोपट पुंड, भाऊसाहेब काळे, संदीप गांगर्डे आदींच्या सह्या आहेत.

## गीताबाई पाराशर यांचे अल्प आजाराने निधन


नगर – केडगाव आरती हॉटेल मागील रहिवासी गीताबाई शामसुंदर पाराशर (वय ५३) यांचे १९ मार्च रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे आई, वडील, १ भाऊ, भावजय, २ मुले असा परिवार आहे. गोविंद पाराशर यांच्या त्या बहीण होत.

## पुरुषोत्तम खानचंदानी यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – येथील पुरुषोत्तम गुलाबराय खानचंदानी (वय ७४) यांचे १९ मार्च रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे, ४ भाऊ, भावजया, २ बहिणी, मुलगी, जावई, पुतणे, पुतण्या असा परिवार आहे. एम जी रोड वरील लक्ष्मी वॉच कंपनी तसेच मॉडर्न बेकरीचे ते संचालक होत.

**हनुमान चालिसा पाठ**

**शनिवार दि. २१/३/२०२६**
**रात्री ८.३० ते १०.३०**

**श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर**

**महात्मा फुले मित्र मंडळ,** शिंदे मळा, नायरा पेट्रोल पंपाजवळ, बालिकाश्रम रोड, गिरीश शिंदे ९९२१०४७००७, राहुल शिंदे ९८२२९४४४४९

**मंगल भक्त सेवा मंडळ, मंगल दत्तक्षेत्र, एम.आय.डी.सी.**

**क्रांतीवीर प्रतिष्ठाण,** प्रोफेसर कॉलनी चौक, सावेडी, रमेश हिवाळे ९८८१६४४५४९, स्वप्नील शहाणे ९७६६७७८४५४

**श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडळ, सारडा लेन, गंजबाजार**

**श्री दाळमंडई तरुण मंडळ,** दाळमंडई, ९४२२२२४८४५

**श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट) नवीपेठ**

**आदर्श युवक मित्र मंडळ ट्रस्ट,** संतोष गेनाप्पा, संजय गेनाप्पा, संत ज्ञानेश्वर चौक, कोर्टगल्ली

**श्री संकट मोचन हनुमान मंडळ, श्री रामदेवरा दरबार, सारसनगर**

**व्यंकटेश पतके,** साई श्रद्धा बंगला, दक्षिणमुखी हनुमान मंदिर जवळ, पाथर्डी रोड, भिंगार ९०२८०८८५४७


# नगरमध्ये फायनान्स कंपनीची १५ लाख ३० हजारांची फसवणूक

**बोल्हेगाव उपनगरातील प्रकार, एका जणाविरुद्ध गुन्हा दाखल**

नगर – इतर बँकेतून सोने तारणावर घेतलेले कर्ज फेडण्याच्या बहाण्याने आणि बनावट पावत्या दाखवून मनप्पुरम फायनान्सची तब्बल १५ लाख ३० हजार रूपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार बोल्हेगाव उपनगरात उघडकीस आला आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात १८ मार्च रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मनप्पुरम फायनान्सचे एरीया हेड मॅनेजर सुजीतकुमार फौदारी प्रसाद (वय २९, रा. भाऊसाहेब फिरोदिया शाळेशेजारी, अहिल्यानगर, मुळ रा. भिलाई, छत्तीसगढ) यांनी फिर्याद दिली आहे. सागर रावसाहेब चोथे (रा. नागापूर, अहिल्यानगर) याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संशयित आरोपी सागर चोथे याने बोल्हेगाव येथील मनप्पुरम फायनान्स शाखेचे एरीया हेड मॅनेजर सुजीतकुमार प्रसाद यांचा विश्वास संपादन केला. चोथे याने आपले सोने इतर बँकांमध्ये तारण असल्याचे भासवले आणि ते सोडवून मनप्पुरम फायनान्सच्या बोल्हेगाव शाखेत ठेवतो असे आमिष दाखवले. त्यासाठी त्याने इतर बँकांच्या बनावट सोने तारण पावत्या सादर करून मॅनेजर प्रसाद यांची दिशाभूल केली. यावर विश्वास ठेवून शाखेने त्याला १५ लाख ३० हजार रूपयांचे कर्ज मंजूर केले. सदरचा प्रकार ८ ते ९ डिसेंबर २०२५ दरम्यान घडला.

पैसे मिळाल्यानंतर संशयित चोथे याने सोने जमा न करता मोबाइल बंद करून पळ काढला. संशय आल्याने प्रसाद यांनी इतर बँकांमध्ये चौकशी केली असता, सागर चोथे नावाने कोणतेही सोने तारण नसल्याचे समोर आले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच सुजीतकुमार प्रसाद यांनी पोलिसांत धाव घेतली. एमआयडीसी पोलिसांनी संशयित सागर चोथे विरोधात फसवणूकीचा गुन्हा नोंदवला आहे. पोलीस अंमलदार एस. जी. टेमकर अधिक तपास करीत आहेत.

## कल्पवृक्ष श्री स्वामी समर्थ मठ येथे स्वामी समर्थ प्रकटदिनानिमित्त कार्यक्रम

नगर – दिल्ली गेट येथील सातभाई मळ्यातील कल्पवृक्ष श्री स्वामी समर्थ मठ येथे श्री स्वामी समर्थ प्रकट दिन सोहळ्या निमित्त २१ मार्च रोजी दुपारी १ ते ५ यावेळेत महाप्रसाद होईल. २२ रोजी सायंकाळी ६ वा. हभप दुतारे महाराज यांचे काल्याचे किर्तन होऊन सोहळ्याची सांगता होईल. तरी भाविकांनी या कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन श्री. राहुल दादा यांनी केले आहे.

## विळदच्या सोलर प्रकल्पातून तांब्याच्या केबलची चोरी

नगर – विळद परिसरात असलेल्या एका सोलर ऊर्जा प्रकल्पात चोरट्याने सुरक्षा यंत्रणेला गुंगारा देत १ हजार मीटर लांबीची तांब्याची केबल चोरून नेली. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सावेडी परिसरातील लक्ष्मीनगर येथे राहणारे आकाश बाळासाहेब गायकवाड हे खासगी नोकरी करतात. विळद येथील ’प्रिमीअर एनर्जी’ या सोलर ऊर्जा प्रकल्पाची जबाबदारी त्यांच्याकडे आहे. १४ मार्च रोजी सायंकाळी ४ वाजेपासून १६ मार्च रोजी सकाळी १० वाजेच्या दरम्यान, प्रकल्पाच्या आवारात कोणीही नसताना अज्ञात चोरट्याने आत प्रवेश केला आणि सुमारे ४५ हजार रुपये किमतीची काळ्या आणि लाल रंगाची, १००० मीटर लांबीची तांब्याची इलेक्ट्रिक केबल लंपास केली.

हा प्रकार लक्षात आल्यानंतर गायकवाड यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दिली. या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३ (२) नुसार गुन्हा नोंदवला आहे. घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी आणि पोलीस हवालदार मिसाळ यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार मिसाळ करत आहेत.


सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी विधान परिषदेत अ‍ॅट्रॉसिटी कायद्याबाबत केलेल्या वादग्रस्त विधानाचा राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने या विधानाचा जाहीर निषेध करण्यात आला असून, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांना यासंदर्भात निवेदन देण्यात आले.

# ‘अ‍ॅट्रॉसिटी’ बाबत मंत्री संजय शिरसाट यांच्या विधानाचा अहिल्यानगर शहरात जाहीर निषेध

नगर – सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी विधान परिषदेत अ‍ॅट्रॉसिटी कायद्याबाबत केलेल्या वादग्रस्त विधानाचा पडसाद अहिल्यानगरमध्ये उमटले आहेत. राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने या विधानाचा जाहीर निषेध करण्यात आला असून, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांना यासंदर्भात निवेदन देण्यात आले.

याप्रसंगी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे प्रदेश कार्याध्यक्ष शिवाजीराव साळवे, जिल्हाध्यक्ष बाळासाहेब केदारे, युवक प्रदेश कार्यकारणी सदस्य कैलास गांगर्डे, सचिव माणिकराव नवसुपे, जिल्हा कार्याध्यक्ष रोहिदास उदमले, नगर तालुकाध्यक्ष आप्पासाहेब केदारे, जिल्हा कार्यकारणी सदस्य संतोष त्रिंबके यांसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

नुकत्याच झालेल्या विधान परिषदेच्या अधिवेशनात मंत्री संजय शिरसाट यांनी, आता अ‍ॅट्रॉसिटीमध्ये लगेच अटक न होता आधी चौकशी होईल, असे वक्तव्य केले होते. या विधानामुळे दलित समाजात संभ्रमाचे आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या विधानाचा निषेध करण्यासाठी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले.

अ‍ॅट्रॉसिटी कायदा (१९८९) हा केंद्रीय कायदा असून, त्यात बदल करण्याचा अधिकार केवळ संसदेला आहे. राज्य सरकारला असे बदल करण्याचे अधिकार नसताना मंत्र्यांनी असे विधान करणे चुकीचे आहे. जबाबदार पदावर असलेल्या व्यक्तीने अशा प्रकारचे अज्ञानमूलक वक्तव्य करून समाजाची दिशाभूल करू नये. अशा विधानांमुळे शोषित समाजामध्ये असुरक्षिततेची आणि अन्यायाची भावना निर्माण होत असल्याची भीती महासंघाने व्यक्त केली आहे.

मंत्र्यांनी अशा प्रकारच्या ‘पुड्या’ सोडून समाजात तेढ किंवा संभ्रम निर्माण करू नये. प्रशासनामार्फत आमचा हा तीव्र निषेध राज्य सरकारपर्यंत पोहोचवावा, अशी मागणी या वेळी पदाधिकाऱ्यांनी केली.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### चुकीच्या वेळी पाणी पिल्यास

पाणी हे जीवन आहे, पण आयुर्वेदानुसार, ते औषधासारखे मानले पाहिजे. जर तुम्ही सकाळी उठल्यावर चहाऐवजी झोपताना पाणी प्यायले तर तुम्ही तुमच्या आरोग्याच्या दिशेने पहिले पाऊल टाकले आहे. पण फक्त पाणी पिणे पुरेसे नाही; ते योग्य वेळी आणि योग्य पद्धतीने पिणे आवश्यक आहे. चुकीच्या पद्धतीने पाणी पिल्याने तुमच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतात. आयुर्वेदानुसार सकाळी पाणी पिण्याची योग्य पद्धत आणि तंदुरुस्त राहण्याचे सोपे नियम जाणून घ्या. आजकाल लोक रेफ्रिजरेटरमधील थंड पाणी पिण्यास प्राधान्य देतात, जे आयुर्वेदात विषारी मानले जाते. सकाळी नेहमी कोमट पाणी प्या. कोमट पाणी आतड्यांमधून कचरा (मल) स्वच्छ करण्यास मदत करते आणि शरीरातील चयापचय गतिमान करते. यामुळे वजन कमी होण्यास देखील मदत होते. लोक अनेकदा घाईघाईत उभे राहून पाणी पितात, ज्यामुळे पाणी थेट खालच्या पोटात जाते, ज्यामुळे मूत्रपिंड आणि सांध्याला नुकसान होते. पाणी नेहमी बसून प्यावे आणि घोट घोट करून प्यावे. यामुळे लाळ पाण्यामध्ये मिसळते आणि पोटात जाते, ज्यामुळे आम्लता दूर होते.

## पाककला

### पावभाजी सॅण्डविच

**साहित्य** : १-२ उकडलेले बटाटे, पावभाजी मसाला, १ कांदा, १ टॉमेटो, ८ पावाच्या स्लाईस

**कृती** : उकडलेले बटाटे सोलून कुस्करावेत. तव्यावर तेल आणि जिरा फोडणी करुन त्यात कांदा आणि टॉमॅटो बारीक चिरुन मऊ होईपर्यंत परतावे. आता पावभाजी, उकडलेला बटाट्याचा लगदा आणि पावभाजी मसाला (अथवा कोणताही आवडता मसाला) आणि मीठ टाकून थोडावेळ परतावे. मिश्रण प्रवाही नसावे. घट्टसर असावे. पावावर या मिश्रणाचा थोडा जाड थर देऊन वर दुसरी स्लाईस लावावी. आणि तव्यावर तेल वा लोणी थोडे टाकून सोनेरी भाजावे. कडा बंद करण्यासाठी आपण पावांच्या आत भाजीच जाड थर दिलेला असेल तो थोडा कडांच्या बाहेर आलेला असेलच. पाव उभे करुन चारी कडा थोडावेळ परताव्या. बाहेर आलेली भाजी २ पावांना चिकटवण्याचे काम करेल.

## वास्तू

### जिन्याची दिशा

✻ व्यावसायिक जागेच्या मध्यभागी जिना बांधणे टाळा कारण त्यामुळे आर्थिक नुकसान होऊ शकते. दक्षिण किंवा नैऋत्य दिशा पसंतीची आहे. तसेच, पायऱ्या रंगवताना, हलके रंग निवडा.

✻ जरी तुम्ही खूप व्यस्त असलात तरी, तुम्ही कधीही तुमचे जेवण तुमच्या ऑफिसच्या डेस्कवर ठेवू नये. वास्तुनुसार ऑफिससाठी असे केल्याने नकारात्मक परिणाम होऊ शकतो. तुमचे जेवण पॅन्ट्रीमधून आणा आणि ते वेगळ्या ठिकाणी खा. पॅन्ट्री ऑफिसच्या आग्नेय कोपऱ्यात आहे याची खात्री करा.

## सौंदर्य

झोपण्यापूर्वी, नारळाच्या तेलात थोडे अक्रोड पावडर मिसळून स्क्रब करा. तेलाचा थर लावा आणि ते राहू द्या. यामुळे तुमच्या कोपरांवरील खडबडीत त्वचा मऊ होईल. सूर्यप्रकाशात असताना सूर्यकिरणांमुळे काळे डाग अधिक गडद होऊ शकतात.

## सल्ला

मखान्यांना आर्द्रतेपासून वाचवण्यासाठी ते हवाबंद कंटेनरमध्ये साठवणे. मखाना नेहमी हवाबंद कंटेनरमध्ये साठवा. यामुळे ओलावा आणि हवा आत जाण्यापासून रोखली जाईल, ज्यामुळे ते कुरकुरीत राहतील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

शनिवार, दि. २१ मार्च २०२६

**गौरी तृतीया, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, चैत्र शुक्लपक्ष, अश्विनी २४।३८, सूर्योदय ०६ वा. २७ मि. सूर्यास्त ०५ वा. २६ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : पैसा खर्च होईल. संतती बरोबर मतभेद किंवा त्यांच्या चिंतेत मन व्यग्र राहील. सामाजिक कार्यात आघाडी घ्याल.

**वृषभ** : नवीन कामाची सुरूवात करण्याला अनुकूल दिवस. मित्रांबरोबर दिवस आनंदात घालवाल. मागील देणी वसुल होतील.

**मिथुन** : विद्यार्थ्यांना आज अभ्यासात रस वाटणार नाही. शेअर्समध्ये गुंतवणूक करू शकाल. आध्यात्मिकतेतून शांती मिळेल.

**कर्क** : मित्र आणि कुटुंबीय यांच्याबरोबर आनंदात दिवस घालवाल. प्रवास, सहली यातूनही आज आनंद मिळवू शकता.

**सिंह** : आध्यात्मिकतेच्या मदतीने विचारातील नकारात्मकता दूर कराल. मनाच्या एकाग्रतेमुळे सर्व कामात फायदा होईल.

**कन्या** : स्वकीयांचा वियोग घडू शकतो. कुटुंबातील लोकांशी मतभेद संभवतात. मोठे व्यावसायिक नुकसान संभवते.

**तूळ** : देण्या-घेण्याचे निर्णय विचारपूर्वक घ्या. अपघात व गैरसमज यापासून दूरच राहा. वाहने सावकाश चोरीला जातील.

**वृश्चिक** : शारीरिकस्वास्थ्य बिघडू शकते. विनाकारण खर्च होईल. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**धनु** : आज अध्यात्माकडे कल राहिल. जुने मित्र व नातेवाईक यांच्या सहवासामुळे दिवस आनंदात व्यतीत होईल.

**मकर** : उतावीळ स्वभावावर नियंत्रण ठेवून कार्ये शांततेत केल्यास आजचा दिवस हा यशदायी ठरेल. उधारी वसुल होईल.

**कुंभ** : हितशत्रुंपासून पिडा संभवते. संततीसौख्य लाभेल. कोर्ट-कचेरी आदी गोष्टींपासून लांब रहा.

**मीन** : आर्थिक व्यवहार करताना अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका. तब्येत सांभाळा.

## शब्दगंध क्र. ७३९१ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ■ | ५ | ६ | ७ |
| ८ | | | | ९ | ■ | १० | |
| | ■ | ■ | ११ | | १२ | | |
| ■ | १३ | १४ | | ■ | १५ | | ■ |
| ■ | १६ | | ■ | १७ | | ■ | १८ |
| १९ | | | ■ | २० | | | |
| | ■ | ■ | २१ | | | ■ | |
| २२ | | | | ■ | २३ | | |

**आडवे शब्द :-** १) चांगले व वाईट (याचे ज्ञान) ५) साधन; सामुग्री ८) आठवड्यातील एक दिवस १०) मस्ती; जोर ११) हातचलाखी; पाहऱ्याखाली ठेवणे १३) एक चर्मवाद्य १५) माज; कैफ; नशा १६) पिकांवर पडणारा एक रोग; खवा १७) पडणे; नाश; पतन १९) लवकर; कमी वेळेत २०) 'कॉम्प्युटर'चे मराठी रूप २१) मीलन; मिलाफ; दोन नद्या एकत्र येतात ते ठिकाण २२) जामीन; हमी; प्रतिभू २३) सूर्य; भास्कर; रवि

**उभे शब्द :-** १) एक मराठी आडनाव; मांडलिक राजा २) क्रोध ३) टरफल असलेला तांदूळ ४) पाठवणी ६) मर्यादा; नियम; कायदा ७) रोख; कॅश ९) तीन गुणांपैकी एक; धूळ १२) अगदी सहज; हसतखेळत १३) ओझे वाहणारा; भारवाहक १४) भांडण सोडविणारे त्रयस्थ मंडळ १७) तराजूच्या तोलातील विषमपणा व तो काढून टाकण्यासाठी एका पारड्यात टाकले जाणारे वजन १८) गोळा करणे; जमविणे १९) पाण्यातून जाणारे वाहन; होडी; नाव २१) संसाराविषयी आसक्ती सोडून ईश्वरभजनी लागलेली व्यक्ती

### शब्दगंध क्र. ७३९० चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वि | सा | र | ■ | रा | म | रा | म |
| जा | ने | वा | री | ■ | ग | ज | ल |
| पू | ■ | ना | म | दा | र | ■ | म |
| र | ग | ■ | ■ | द | ■ | झे | ल |
| ■ | र | म | ता | रा | म | ■ | ■ |
| द | ग | द | ग | ■ | ग | ■ | पा |
| बा | री | ■ | ■ | मा | ज | घ | र |
| व | त | न | दा | र | ■ | न | ख |

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार** : स्वत:ला असे बनवा की लोक तुमच्याकडे एकमेव उपाय म्हणून पाहतील पर्याय म्हणून नाही.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### प्रौढांना कोणत्या लसींची आवश्यकता असते?

लसीकरणाचा विचार केला तर आपले लक्ष बहुतेकदा मुलांकडे असते. तथापि, आजच्या जगात, जिथे दररोज नवीन प्रकारचे रोग उद्भवत आहेत, प्रौढांसाठी लसीकरण तितकेच आवश्यक बनले आहे. कमकुवत प्रतिकारशक्ती शरीराला विविध संसर्गांना बळी पडू शकते. म्हणूनच, हे समजून घेणे महत्वाचे आहे की काही लसीकरणे केवळ प्रौढांसाठी निरोगी राहण्याचे साधन नाहीत तर गंभीर आजारांपासून संरक्षणात्मक कवच देखील आहेत.

या साथीच्या आजारामुळे लोकांना लसीकरणाचे महत्त्व कळले आहे, परंतु अनेक प्रौढांना अजूनही माहित नाही की त्यांनी कोणत्या लसी घ्याव्यात. या लेखात, आपण १८ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या प्रत्येकाने घ्याव्यात अशा सात आवश्यक लसींबद्दल चर्चा करू. या लसी केवळ तुमचे आरोग्य सुधारतीलच असे नाही तर तुमच्या सभोवतालच्या लोकांना संसर्गापासून वाचवतील.

१. इन्फ्लूएंझा लस (फ्लू शॉट) - बरेच लोक इन्फ्लूएंझा, हंगामी फ्लूला साधे सर्दी आणि खोकला समजतात, परंतु हा एक विषाणूजन्य संसर्ग आहे जो कधीकधी प्राणघातक ठरू शकतो. वृद्ध, गर्भवती महिला आणि दीर्घकालीन आजार असलेल्यांना याचा विशेषतः त्रास होतो. दरवर्षी इन्फ्लूएंझा विषाणूचे नवीन प्रकार उदयास येतात, म्हणून दरवर्षी लसीकरण करणे आवश्यक आहे. यामुळे सर्दी, ताप, घसा खवखवणे आणि श्वास घेण्यास त्रास होणे यासारख्या समस्यांपासून तुमचे संरक्षण होऊ शकते.

२. हिपॅटायटीस बी लस - हिपॅटायटीस बी हा एक गंभीर विषाणूजन्य संसर्ग आहे जो यकृतावर परिणाम करतो आणि दीर्घकाळात यकृत निकामी होणे, सिरोसिस किंवा यकृताचा कर्करोग होऊ शकतो. हा विषाणू संक्रमित रक्त, सिरिंज, लैंगिक संपर्क आणि अगदी जन्मादरम्यान आईपासून बाळापर्यंत पसरू शकतो. हिपॅटायटीस बीची लस तीन डोसमध्ये दिली जाते आणि दीर्घकालीन प्रतिकारशक्ती प्रदान करते. आरोग्यसेवा कर्मचारी, वैद्यकीय विद्यार्थी, प्रवासी आणि यकृताचे कार्य बिघडलेले असलेल्यांनी ही लस निश्चितच घ्यावी.

३. टीडीएपी लस - टिटॅनस, घटसर्प आणि डांग्या खोकला (डांग्या खोकला) हे तीन गंभीर आजार आहेत जे प्रौढांना प्रभावित करू शकतात. Tdap bg या तिन्ही आजारांपासून संरक्षण करते. टिटॅनस कापलेल्या किंवा जखमेतून शरीरात प्रवेश करू शकतो, घटसर्पामुळे घसा खवखवणे आणि श्वास घेण्यास त्रास होतो, तर डांग्या खोकला हा धोकादायक, दीर्घकाळ टिकणारा खोकला आहे. ही लस दर १० वर्षांनी ताजी करावी, विशेषतः गर्भवती महिला आणि लहान मुलांच्या संपर्कात असलेल्यांसाठी. LSO RED: प्रथिनांच्या कमतरतेवर मात करण्यासाठी हे टिप्स अवलंबवा

४. एचपीव्ही लस - एचपीव्ही, किंवा ह्युमन पॅपिलोमाव्हायरस, हा लैंगिकरित्या पसरणारा विषाणू आहे जो गर्भाशयाच्या ग्रीवेच्या कर्करोगाचे मुख्य कारण आहे. ही लस ९ ते ४५ वयोगटातील पुरुष आणि महिला दोघांनाही दिली जाऊ शकते. ही लस जीवनरक्षक मानली जाते, विशेषतः तरुणींसाठी. भारतात, आता ती सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमात समाविष्ट केली आहे. ही लस केवळ कर्करोगापासून संरक्षण करत नाही तर लैंगिक संक्रमित आजारांपासून देखील संरक्षण प्रदान करते.

५. न्यूमोकोकल लस - न्यूमोकोकल लस ही बॅक्टेरियामुळे होणाऱ्या न्यूमोनिया, मेनिंजायटीस आणि रक्तप्रवाहाच्या संसर्गापासून संरक्षण करते. ही लस विशेषतः ६५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या लोकांसाठी, मधुमेह, मूत्रपिंड किंवा हृदयरोग असलेल्यांसाठी आणि धूम्रपान करणाऱ्यांसाठी महत्त्वाची आहे. भारतासारख्या देशात, जिथे हिवाळ्यात न्यूमोनियाचे रुग्ण लक्षणीयरीत्या वाढतात, ही लस जीवनरक्षक पर्याय बनते.

६. व्हॅरिसेला लस (कांजिण्या) - जर तुम्हाला लहानपणी कांजिण्या झाल्या नसतील किंवा लस घेतली नसेल, तर प्रौढावस्थेत हा आजार होणे खूप गंभीर असू शकते. त्यामुळे तीव्र ताप, संपूर्ण शरीरात फोड येणे आणि त्वचेचे संक्रमण होऊ शकते. प्रौढांना, विशेषतः जे ऑफिसमध्ये किंवा सार्वजनिक ठिकाणी बराच वेळ घालवतात त्यांना कांजिण्यांपासून वाचवण्यासाठी व्हॅरिसेला लस आवश्यक आहे.

### धाडसाची ओळख

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. जंगलात एक सुंदर हरीण राहत होती. त्यापैकी सुरीली नावाची एक हरीण होती. तिची मुलगी, मृगनैनी, फक्त पाच महिन्यांची होती.

मृगनैनी तिच्या आईसोबत जंगलात फिरत असे. एके दिवशी, मृगनैनी तिच्या आईसोबत फिरत असताना, दोन कोल्हे आले. त्यांना मृगनैनीला मारून खायचे होते.सुरीलीने तिच्या शिंगांनी मारून दोन्ही कोल्हेंना रोखण्याचा प्रयत्न केला. पण कोल्हे हार मानण्यास नकार दिला. अचानक, हरणांचा एक मोठा कळप दिसला. हरीण कोल्हेचा पाठलाग करू लागली. कोल्हे पळून गेला.

सुरीली आणि मृगनैनीचे जीव आज त्यांच्या कुटुंबियांनी वाचवले.

तात्पर्य : एकत्र राहिल्याने सर्वात कठीण आव्हानांवरही मात करता येते.

## जीवन का अमृत (भाग १)



८२. प्रेम की जबान गूंगी होती है। दिल की हालत लफ्जों में ठीक से बयान नहीं की जा सकती है। जो कुछ लफ्ज बयान भी करते हैं, वह सिर्फ घटिया सा व्यंग्य चित्र होता है।

अपने क्रिसमस के संदेश में मैंने जो कुछ लिखा, उससे आपको डरने की कोई जरूरत नहीं है। हम में से हर एक को उस सतुगुरु की खुशी हासिल करने का प्रयत्न करना चाहिए, जिसके कदमों में हम कार्यरत हैं। मेरा जाना अभी नजदीक नहीं हैं, अतः आपको डरने की जरूरत नहीं। आप हमेशा मेरे दिल में है। गुरु-सत्ता आपको कभी नहीं छोड़ेगी, संसार के खत्म होने तक। दिल में जलती हुई विरह की आग आँसुओं से नहीं बुझती। जैसे पेड़ पर फल लगने से पहले फूल आते है, वैसे ही अंतर

### बेचैनी और तडप

में सतुगुरु प्रकट होने से पहले दिल में बेचैनी और तडप पैदा होती है।

सतुगुरु की मीठी याद में बहने वाला हर आँसू आपको उसके और करीब ले जाता है। यदि आप उसे दिल में बसाओगे, तो स्वाभविक हैं. आप उसके दिल में बसोगे ।

✻✻✻

८१. गुरु-सत्ता सदा अपने बच्चों की जरूरतों और लालसाओं को जानती हैं और उनके भले के लिए कार्य करती है। सभी कमियों को एक-एक करके निकालना होगा और जब बालक शिष्य अपनी कमियों को निकालने की भरसक कोशिश करता है, तो अंतर से हर जरूरी सहायता मिलती है।

इस कोशिश में बहुत समय लग सकता है, पर यह अवश्य सफल होगी और वे लोग जल्दी सफल होंगे, जो प्रेम और श्रद्धा से सतुगुरु को समर्पित रहेंगे।

८३. सतुगुरु का अपने बच्चों के प्रति प्रेम कभी कम नहीं होता, वे सभी उसे प्रिय हैं। यह दुर्भाग्य की बात है, जब एक शिष्य अपने दिल के दरवाजे बन्द कर लेता हैं और यह मधुर अलैकिक प्रेम उसके हृदय तक नहीं पहुँच पाता। एक स्नेही पिता यह देखकर सदा खुश होगा कि उसके बच्चे उसकी ओर मुड़े और उसकी दया का लुत्फ उठाएें। वह कभी भी किसी के भी प्रति कठोर नहीं हो सकता। पर उसकी रस्सी लंबी है, क्योंकि वह उनको जोर की ठोकर नही मारना चाहता।

✻ ✻ ✻

८४. जब भी जरूरत हो, सतुगुरु अंतर और बाहर, दोनों क्षेत्रों में

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

वाटतं की, हे सगळं जेव्हा बाहेरून मिळेल तेव्हा आपण त्याचा अनुभव घेऊ. पण प्रेमळ होणं म्हणजे आपण आपल्या आत्म्याचे मूळ गुण आणि वैशिष्ट्यं यांच्या बरोबर राहणं.

सुरेश ओबेरॉय : तर प्रेमात असण्याचा अर्थ- 'मी प्रेम आहे' असा आहे का? शिवानीदीदी : हो, हाच याचा अर्थ आहे.. आत्म्यासंबंधी बोलायचं तर प्रेम याचा मूळ गुण आहे. मग आपण संपूर्ण दिवस कसं राहायला हवं? आपण संपूर्ण दिवस प्रेमळ राहायला हवं. बीइंग लव्ह किंवा प्रेमळ अस्तित्व असण्याचे दोन अर्थ आहेत. पहिला, 'प्रेम असणं' आणि दुसरा 'अस्तित्वाचा.' अशा प्रकारे प्रेम हेच आत्म्याचं मूल तत्त्व आहे. दररोज सकाळी आपण स्वत:ला आठवण करून द्यायला हवी की आपल्याकडे पदार्थांचे दोन संच आहेत. एक संच प्रेम, शांती

### नाते म्हणजे दोन आत्म्यांतील संपर्क

आणि आनंद यांचा आणि दुसरा, राग, चिडचिड, द्वेष इत्यादींचा. दिवसभरातल्या प्रसंगांमध्ये कोणते पदार्थ वापरायचे हे आपल्यालाच ठरवायचं आहे. सकाळी जर नोकराने तुम्हाला कोरा चहा आणून दिला तर अशा परिस्थितीत थोड्या वेगळ्या प्रकारे प्रतिक्रिया देण्यासाठी कोणता पदार्थ (तुमचा गुण ) वापरायचा याची निवड तुम्ही करू शकता. ही निवड तुम्ही तत्क्षणी करू शकता किंवा आधीच तुमच्या मनाची तयारी करू शकता. तुमच्या मूळ गुणांपैकी प्रेम हा गुण जर तुम्ही निवडला तर परिस्थिती तुमच्या नियंत्रणात राहील. मग ही परिस्थिती तुमच्या मानसिक स्थितीचा ताबा घेणार नाही.

सुरेश ओबेरॉय : मी अशी प्रतिक्रिया देऊ शकलो असतो की, दूध नसेल तर काही हरकत नाही, लिंबू आण. मी आज लेमन टी घेईन. यामुळे वादविवादाशिवाय सहजतेने अडचण सुटली असती.

शिवानीदीदी : त्या एका क्षणात आपली मनःस्थिती कशी आहे हे खूप महत्त्वाच ठरतं. परिस्थिती आपल्या वरचढ झाली की आपण कमकुवत होतो.

सुरेश ओबेरॉय : जेव्हा आपण जन्माला आलो; तेव्हा परमानंद, प्रेम, शुद्धता आणि शक्ती हे आत्म्याचे सगळे चांगले गुण आपल्यात होते. नंतर त्यांचं काय झालं? एखादं वाहन जर डिझेलवर चालणारं असेल तर आपण त्यात पेट्रोल भरू शकत नाही. जर आपण प्रेमाने आणि परमानंदाने बनलो आहोत तर आपण नेहमी असेच का राहत नाही?

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

शिक्षक : जर कोणी शाळेत बॉम्ब ठेवला तर तू काय करशील?
पप्पू : आपण काही तास बघत राहू. जर कोणी तो घेतला तर ठीक आहे. नाहीतर, आपण तो स्टाफ रूममध्ये सोडून देऊ.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ कारा पटेल अमेरिकेच्या प्रमुख कायदा अंमलबजावणी नेतृत्व करणारे कितवे अमेरिकन भारतीय बनले आहेत? - १ ले

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आहारवेद - आरोग्य संवर्धन

उन्हाळ्याच्या शेवटी व पावसाळ्याच्या सुरुवातीस काळसर जांभळ्या रंगाच्या जांभळाचे घड झाडाला लटकलेले दिसतात. निसर्गाने निर्माण केलेले हे फळ शरीरामध्ये अमृतासमान कार्य करते. ग्रीष्म ऋतूत आंबा हे अमृतफळ असते, तर वर्षा ऋतूत जांभूळ हे अमृतफळ असते. गोल, लांबट आकाराची जांभळे ही खरोखरच चवीला आंबट-गोड व रसरशीत असतात. जांभळांचा आस्वाद हा तृप्तीदायक, मनाला आल्हाददायक असतो.

प्राचीन काळापासून भारतामध्ये ही वनस्पती आहे व तिचा आहाराबरोबरच औषधातदेखील समावेश केला आहे. मराठीत 'जांभूळ', हिंदीमध्ये 'जामून',

### जांभूळ

संस्कृतमध्ये 'कृष्णबदरी', इंग्रजीत 'ब्लॅकबेरी', तर शास्त्रीय भाषेमध्ये जांभळाला 'युजेनिया जांबोलाना' या नावाने ओळखले जाते व ते मिरटेसी या वनस्पती कुळातील आहे.

औषधी गुणधर्म :

आयुर्वेदानुसार : जांभूळ हे दीपक, पाचक, यकृत उत्तेजक व स्तंभक असते. पंडुरोग (ॲनिमिया), कावीळ, रक्तदोष विकार या आजारांवर जांभळे खाल्ली असता त्यामध्ये नैसर्गिकरीत्या असलेल्या लोह तत्त्वामुळे हे आजार आटोक्यात येतात.

आधुनिक शास्त्रानुसार : जांभळामध्ये लोह, कॅल्शिअम, फॉस्फरस, 'क' जीवनसत्त्व यांचे प्रमाण अधिक असते. तर किंचित प्रमाणात 'ब' जीवनसत्त्व असते. यामध्ये प्रथिने, खनिजे, तंतुमय व पिष्टमय पदार्थ व थोड्या प्रमाणात मेद असतो. त्याचबरोबर कोलीन व फोलिक आम्लही त्यामध्ये असते. जांभळाचे पान हे उत्कृष्ट स्तंभक आहे. तसेच कोवळ्या पानात 'ई' जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात आहे.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



अहिल्यानगर-पुणे रोडवरील चास परिसरात संदीप उद्योग समूहाच्या 'हॉटेल सचिन'चा शुभारंभ सिने अभिनेता सोनू सूद यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आला. यावेळी खासदार संदिपान भुमरे, मा. आ. अण्णासाहेब माने, आ. सुरेश आण्णा धस, आ. काशिनाथ दाते, धनश्री विखे, जिल्हा परिषदेचे सदस्य संतोष माने, उद्योजक चंद्रकांत गाडे, बाळासाहेब केरुनाथ विखे, भानुदास मुरकुटे, राजेंद्र चोपडा, विनायक देशमुख यांच्यासह संदीप उद्योग समूहाचे सुरेखा कोतकर, भानुदास कोतकर, माजी महापौर संदीप कोतकर, सचिन कोतकर, अमोल कोतकर आदींसह नागरिक उपस्थित होते (छाया – समीर मन्यार)

# महाराष्ट्रासह देशभर 'संदीप उद्योग समूह'ची वेगळी ओळख

## सोनू सूद यांचे प्रतिपादन, अहिल्यानगर-पुणे रोडवरील 'हॉटेल सचिन'चा शुभारंभ; शहर विकासात समूहाचा मोलाचा वाटा

नगर – संदीप उद्योग समूहाची पहिली भेट हाँगकाँग येथे संदीप उद्योग समूहाच्या मिळालेल्या पुरस्काराप्रसंगी झाली. एखाद्या शहराची प्रगती व ओळख ही त्या शहरातील उद्योग-व्यवसायावर अवलंबून असते. उत्कृष्ट हॉटेल्समुळे व्यवसायाला चालना मिळते. संदीप उद्योग समूहाने ग्राहकांचा विश्वास संपादन करत महाराष्ट्रासह संपूर्ण भारतभर वेगळी ओळख निर्माण केली आहे, असे प्रतिपादन सिने अभिनेता सोनू सूद यांनी केले.

अहिल्यानगर-पुणे रोडवरील चास परिसरात संदीप उद्योग समूहाच्या 'हॉटेल सचिन'च्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाला छत्रपती संभाजीनगरचे खासदार संदिपान भुमरे, मा. आ. अण्णासाहेब माने, आ. सुरेश आण्णा धस, आ. काशिनाथ दाते, धनश्री विखे, संभाजीनगर जिल्हा परिषदेचे सदस्य संतोष माने, उद्योजक चंद्रकांत गाडे, बाळासाहेब केरुनाथ विखे, भानुदास मुरकुटे, राजेंद्र चोपडा, विनायक देशमुख यांच्यासह संदीप उद्योग समूहाचे सुरेखा कोतकर, भानुदास कोतकर, माजी महापौर संदीप कोतकर, सचिन कोतकर, अमोल कोतकर आदींसह नागरिक उपस्थित होते.

सोनू सूद पुढे म्हणाले, मोठी स्वप्ने पाहून शून्यातून सुरुवात केल्यास उंच शिखर गाठता येते, याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे संदीप उद्योग समूह आहे. कोणत्याही अडचणींना न खचता पुढे जाण्याची वृत्तीच यश मिळवून देते. हॉटेल सचिनचे माझ्या हस्ते शुभारंभ होत आहे त्या माध्यमातून या कुटुंबाचा हिस्सा बनलो आहे त्याचा मला गर्व आहे महाराष्ट्रात नव्हे तर पूर्ण भारतभर संदीप उद्योग समूहाची वेगळी ओळख असल्याचे प्रतिपादन सिने अभिनेता सोनू सूद यांनी केले.

खासदार संदिपान भुमरे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, संदीप उद्योग समूहाचे नाव आता महाराष्ट्रापुरते मर्यादित राहिले नसून संपूर्ण देशभर पोहोचले आहे. वाढत्या ग्राहकसंख्येचा विचार करता संभाजीनगरमध्येही समूहाने विस्तार करावा.

यावेळी संदीप कोतकर यांनी सांगितले की, १९८७ साली सुरू केलेल्या छोट्या उपक्रमाचा आज वटवृक्ष झाला आहे. आई-वडिलांच्या संस्कारांमुळेच आम्ही यश मिळवू शकलो. उद्योगासोबत सामाजिक, कृषी व इतर क्षेत्रातही समूह कार्यरत आहे. त्यांनी मार्गदर्शक स्व. आ.अरुणकाका जगताप व शिवाजीराव कर्डिले यांच्या योगदानाची आठवण करून दिली.

प्रास्ताविकात आदित्यन कोतकर यांनी संदीप उद्योग समूहाची यशस्वीरित्या झालेल्या वाटचालीची सविस्तर माहिती दिली.

यावेळी आमदार सुरेश धस व धनश्री विखे यांनीही मनोगत व्यक्त करत समूहाच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. उदयनराजे कोतकर व विश्वनराजे कोतकर यांनी आभार मानले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## संत काव्याचे व्यापकत्व

"मुसाफिर" वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी चैतन्य पालवी
डॉ. रामचंद्र देखणे
'चपराक' प्रकाशित ललित चिंतन

मराठी साहित्यसृष्टीत विचारतत्त्व आणि प्रबोधनतत्त्वाने जसे संतसाहित्य हे व्यापक आहे तसेच संख्यात्मक भूमिकेतून मराठी साहित्यातील आणि काव्यविश्वातील त्यांचे व्यापकत्त्व अबाधित आहे. प्राचीन संतकाव्याचे ज्येष्ठ संशोधक जगन्नाथ रघुनाथ आजगावकर यांनी 'प्राचीन मराठी संतकवी' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे की, 'एकंदर जुनी मराठी कविता किती आहे? असा जर प्रश्न मला कोणी विचारला तर त्याला मी एवढेच उत्तर देईन की जगातील दुसऱ्या कोणत्याही भाषेत एवढी कविता झाली नाही.'

कमीतकमी १५ लाखाहून अधिक जुनी मराठी कविता आज उपलब्ध आहे आणि त्यातील १० लाखाहून अधिक काव्यसंख्या ही केवळ संतकाव्याची किंवा संतकवितेची आहे. त्यात भारूड, ओवी, पदे, रूपके यांचा समावेश आहे. नुसत्या ज्ञानदेवांच्या ओवी आणि अभंगरचना १० हजाराहून अधिक आहेत. संत एकनाथांची साठ हजार, रामदासांची दहा हजार, रामी रामदासांची दहा हजार, तुकाराम महाराज साडेचार हजार, नामदेवरायांची तीस हजार, याशिवाय निळोबाराय, चोखोबा, जनाबाई, रमावल्लभदास, कृष्णदयार्णव, मुक्तेश्वर, सावतोबा, कान्होपात्रा, दासतुका, नरहरी महाराज, शेख महंमद, गोरा कुंभार, जगमित्र नागा, माणकोजी बोधला, सेनान्हावी, कान्होपाठक, चांगदेव, बहिरा पिसा या संतांच्या काव्याचा समावेश करावा लागेल. या साऱ्या संतांचा कालखंड हा बाराव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंतचा आहे. त्या कालखंडातील राजकीय, सामाजिक पार्श्वभूमी लक्षात घेता छपाईची, प्रसाराची, लोकसंपर्काची माध्यमे नसतानाही त्यांचे काव्य मराठी मुलुखातील सामान्य माणसापर्यंत पोहचले होते.

काव्याची मुख्य तीन लक्षणे सांगितली जातात.

१) प्रसाद २) माधुर्य आणि ३) ओज.

मराठी संतांची कविता तिच्यातील भावपूर्ण भक्तिरसामुळे, प्रासादिकतेने ओथंबलेली आणि शब्दसौंदर्यामुळे माधुर्याने नटलेली तर प्रबोधनाच्या भूमिकेतून 'ओज' तत्त्वाने भारलेली होती. ज्ञानोबांनी एक सुंदर रुपक मांडले आहे.

अंगाचेनि सुंदरपणे।
लेणिया अंगचि होय लेणे ।
तेथ अलंकारिले कवन कवणे ।
हे निर्वचेना ।।

एखाद्या सौंदर्यवतीने अंगावर दागिने घालावेत व ती आणखी सुंदर दिसावी, अशा वेळी तिला वाटते की मी मुळचीच सुंदर आहे. म्हणून माझ्यामुळेच दागिने नटले आहेत व दागिन्यांना वाटते, ही आमच्यामुळे सुंदर दिसते आहे. इथे कुणी कुणाला सुंदर केले किंवा अलंकारिले हे समजत नाही. तसेच संत काव्यामध्ये भावसौंदर्याने शब्द नटले की शब्द सौष्टवाने भावतरंग उमटले हे समजत नाही पण संत काव्याच्या शब्दसौष्टवाने मराठी भाषा मात्र नटली हे निश्चित!

– किशोर गांधी



कामू टाटा मोटर्स शोरूममध्ये वाहन खरेदीसाठी ग्राहकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला.

# कामू टाटा मोटर्स शोरूममध्ये विक्रीचा नवा इतिहास

नगर – एमआयडीसी परिसरातील कामू टाटा मोटर्स शोरूममध्ये गुढीपाडवा निमित्त ग्राहकांचा जनसागर उसळला. नववर्षाच्या मुहूर्तावर वाहन खरेदी करण्याची परंपरा जपत नागरिकांनी उत्साहात नवीन गाड्यांची खरेदी करत विक्रीचा विक्रमी उच्चांक गाठला. सकाळपासूनच शोरूमसमोर ग्राहकांच्या रांगा लागल्या होत्या. कुटुंबासह आलेल्या ग्राहकांनी पारंपरिक पद्धतीने गाडीची पूजा करत आनंद व्यक्त केला.

या खास निमित्ताने शोरूमकडून आकर्षक सवलती, एक्स्चेंज ऑफर्स आणि सुलभ कर्ज सुविधा देण्यात आल्या होत्या. यामुळे ग्राहकांचा प्रतिसाद अधिकच वाढला. विशेषतः नवीन आणि आधुनिक फीचर्स असलेल्या मॉडेल्सना मोठी मागणी असल्याचे दिसून आले.

शोरूम व्यवस्थापनाच्या माहितीनुसार, यंदाच्या गुढीपाडव्याला मागील वर्षाच्या तुलनेत लक्षणीय वाढ नोंदवली गेली असून हा दिवस विक्रीच्या दृष्टीने ऐतिहासिक ठरला आहे. ग्राहकांचा विश्वास, उत्कृष्ट सेवा आणि सणाच्या मुहूर्ताचा संगम यामुळे हा विक्रम शक्य झाला, असे त्यांनी सांगितले.

एकूणच, गुढीपाडवा च्या आनंदोत्सवात एमआयडीसीतील या टाटा शोरूमने विक्रीचा नवा अध्याय लिहिला असून आगामी काळातही अशीच भरारी कायम राहील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# शिवम टीव्हीएस शोरूमतर्फे ग्राहकांसाठी आकर्षक ऑफर्स

## ऑर्बिटर व्ही वन इलेक्ट्रिक स्कूटरची धूम, फक्त रु.४९,९९९ मध्ये आगमन



गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर अहिल्यानगरातील झोपडी कॅन्टीन समोरील शिवम टीव्हीएस शोरूममध्ये ग्राहकांसाठी आकर्षक ऑफर्स जाहीर करण्यात आल्या आहेत.

नगर – गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर अहिल्यानगरातील झोपडी कॅन्टीन समोरील शिवम टीव्हीएस शोरूममध्ये ग्राहकांसाठी आकर्षक ऑफर्स जाहीर करण्यात आल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर टीव्हीएस ऑर्बिटर व्ही वन या अत्याधुनिक इलेक्ट्रिक स्कूटरचे आगमन झाले असून, ग्राहकांकडून त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. ही स्कूटर केवळ रु. ४९,९९९ या परवडणाऱ्या किमतीत उपलब्ध असून, फक्त रु.२,९९९ डाउन पेमेंट भरून ती खरेदी करता येत आहे. त्यामुळे कमी बजेटमध्ये आधुनिक आणि पर्यावरणपूरक वाहन घेण्याची संधी नागरिकांना उपलब्ध झाली आहे. नियम व अटी लागू.

टीव्हीएस ऑर्बिटर व्ही वन मध्ये लाँग रेंज बॅटरी, फास्ट चार्जिंग सुविधा, डिजिटल डिस्प्ले, अँटी-थेफ्ट सिस्टम, आकर्षक रंगसंगती आणि आरामदायी डिझाइन यांसारखी अत्याधुनिक फीचर्स देण्यात आली आहेत. शहरातील दैनंदिन वापरासाठी ही स्कूटर उपयुक्त ठरणार असल्याचे शोरूमतर्फे सांगण्यात आले.

१९९२ पासून ग्राहकांना विश्वासार्ह सेवा देणाऱ्या शिवम टीव्हीएस शोरूमने वाहन विक्रीत आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. टीव्हीएस मोटर कंपनीचे सर्व मॉडेल्स येथे उपलब्ध असून, ग्राहकांना त्यांच्या गरजेनुसार वाहन निवडण्याची सुविधा देण्यात येते.

गुढीपाडव्याच्या निमित्ताने सुरू करण्यात आलेल्या या विशेष ऑफरचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन शोरूम व्यवस्थापनाकडून करण्यात आले आहे. पत्ता : शिवम टीव्हीएस शोरूम, झोपडी कॅन्टीन समोर, अहिल्यानगर, संपर्क :९१३००३०००२ / ९१३००३०००३. आजच भेट द्या आणि आकर्षक ऑफरचा लाभ घ्या.

# गुलाटी मोटर्स, अशोक लेलँड शोरूम येथे गुढीपाडव्याला विक्रीचा नवा उच्चांक



गुलाटी मोटर्स, अशोक लेलँड शोरूम येथे गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर ग्राहकांचा वाहन खरेदीसाठी प्रतिसाद लाभला.

नगर – एमआयडीसी परिसरातील गुलाटी मोटर्स, अशोक लेलँड शोरूम येथे गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर ग्राहकांची अभूतपूर्व गर्दी पाहायला मिळाली. नवीन वर्षाच्या प्रारंभी वाहन खरेदीला शुभ मानले जात असल्याने मोठ्या संख्येने ग्राहकांनी अशोक लेलँडच्या विविध मॉडेल्सना पसंती दर्शवली. यावेळी शोरूममध्ये उत्सवाचे वातावरण निर्माण झाले होते.

गुढीपाडव्याच्या निमित्ताने गुलाटी मोटर्सकडून ग्राहकांसाठी आकर्षक ऑफर्स, सवलती आणि खास योजना राबविण्यात आल्या होत्या. त्यामुळे ग्राहकांचा उत्साह अधिक वाढला आणि दिवसभर शोरूममध्ये वाहन खरेदीसाठी मोठी लगबग सुरू होती. अनेक ग्राहकांनी याच दिवशी नवीन वाहनाची डिलिव्हरी घेणे पसंत केले.

शोरूम व्यवस्थापनाने ग्राहकांच्या स्वागतासाठी विशेष व्यवस्था केली होती. पारंपरिक पद्धतीने गुढी उभारून, फुलांची सजावट, तसेच ग्राहकांचे औक्षण करून त्यांचे स्वागत करण्यात आले. यामुळे ग्राहकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

अशोक लेलँडच्या विश्वासार्हता, दमदार परफॉर्मन्स आणि उत्तम मायलेज यामुळे व्यावसायिक वाहन खरेदीदारांचा कल मोठ्या प्रमाणावर या ब्रँडकडे वळताना दिसत आहे. विशेषतः व्यावसायिक वाहने यांना ग्राहकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला.

गुलाटी मोटर्सच्या प्रतिनिधींनी सांगितले की, गुढीपाडव्याच्या दिवशी दरवर्षी चांगली विक्री होते, मात्र यंदा ग्राहकांचा प्रतिसाद अपेक्षेपेक्षा जास्त मिळाला असून आम्ही विक्रीचा उच्चांक गाठला आहे. आगामी काळातही ग्राहकांचा असा विश्वास कायम ठेवण्यासाठी आम्ही उत्तम सेवा देण्यास कटिबद्ध आहोत.

या विक्रमी विक्रीमुळे अशोक लेलँड ब्रँडची बाजारपेठेतील वाढती लोकप्रियता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. गुढीपाडव्याच्या दिनी झालेल्या या विक्रीमुळे आगामी वर्षासाठी सकारात्मक सुरुवात झाल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

# गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर 'छत्रपती बजाज'मध्ये विक्रमी विक्री



नगर – गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर छत्रपती बजाज शोरूममध्ये ग्राहकांची अभूतपूर्व गर्दी पाहायला मिळाली. सणानिमित्त वाहन खरेदी करण्याची परंपरा लक्षात घेता, अनेक ग्राहकांनी नव्या दुचाकी खरेदीस प्राधान्य दिले असून, बजाज कंपनीच्या विविध मॉडेल्सना विशेष पसंती मिळाली आहे.

शोरूमतर्फे गुढीपाडव्याच्या निमित्ताने आकर्षक सवलती, एक्स्चेंज ऑफर्स, तसेच सोप्या व जलद कर्जयोजना उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. याचा थेट परिणाम विक्रीवर दिसून आला असून, एका दिवसात विक्रीचा उच्चांक गाठण्यात शोरूमला यश आले आहे.

विशेष म्हणजे, तरुण वर्गासोबतच कुटुंबीय ग्राहकांनीही मोठ्या प्रमाणात खरेदीसाठी उपस्थिती दर्शवली. नवीन वर्षाची सुरुवात नव्या वाहनाने करण्याकडे ग्राहकांचा कल स्पष्टपणे दिसून आला.

शोरूममध्ये ग्राहकांच्या स्वागतासाठी आकर्षक सजावट, पूजन कार्यक्रम तसेच पारंपरिक पद्धतीने गुढी उभारून सणाचा उत्साह साजरा करण्यात आला. ग्राहकांना त्वरित डिलिव्हरी देण्यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती, त्यामुळे अनेकांनी त्याच दिवशी आपली नवी गाडी घरी नेली. शोरूम व्यवस्थापनाने सांगितले, ग्राहकांचा विश्वास आणि उत्साह यामुळेच हा विक्रम शक्य झाला आहे. पुढील काळातही उत्तम सेवा, दर्जेदार उत्पादने आणि अधिक आकर्षक योजना देण्याचा आमचा प्रयत्न राहील. शोरूम संपर्क : नगर-मनमाड रोड, सावेडी – ८०८७२०३८६१ / कायनेटिक चौक – ९१७५१४२८८१



महावीरा टीव्हीएस शोरूममध्ये गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर ग्राहकांची खरेदीसाठी झालेली गर्दी.

# 'महावीरा टीव्हीएस'मध्ये गुढीपाडव्याला विक्रीचा विक्रम

नगर – गुढीपाडवा सणाच्या उत्साहात एमआयडीसी येथील महावीरा टीव्हीएस शोरूम ने ग्राहकांना खास भेटी आणि आकर्षक ऑफर्स देत विक्रीचा नवा विक्रम गाठला आहे. शोरूममध्ये गेल्या काही दिवसांत वाढलेली गर्दी पाहून कर्मचारीही आश्चर्यचकित झाले आहेत. विशेष सणानिमित्त शोरूमने गुढीपाडवा स्पेशल ऑफर जाहीर केली होती, ज्यामध्ये खरेदीदारांना आकर्षक सवलती, फायनान्सिंगचे सोपे पर्याय, तसेच काही मॉडेल्सवर बोनस गिफ्ट्सची सुविधा मिळाली. यामुळे ग्राहकांची संख्या दुप्पट झाली आणि विक्रीत मोठा वाढ झाला.

महाविरा टीव्हीएस शोरूमच्या संचालिका समृद्धी कटारिया यांनी सांगितले की की, गुढीपाडवा हा भारतीय सणांमध्ये नववर्षाची सुरुवात म्हणून महत्त्वाचा आहे, त्यामुळे ग्राहकांसाठी आम्ही खास ऑफर्स ठेवल्या होत्या. ग्राहकांचा उत्साह आणि प्रतिक्रिया पाहून आम्ही आनंदित आहोत.

शोरूममध्ये क्लासिक आणि न्यू मॉडेल्सच्या गाड्यांची प्रदर्शन देखील करण्यात आलेली होती, ज्यामुळे ग्राहकांना थेट गाडी अनुभवण्याची संधी मिळाली. या विशेष सणात गाठलेल्या विक्रीच्या आकड्यांनुसार, महावीरा टीव्हीएस शोरूमने गेल्या वर्षांच्या तुलनेत विक्रीत ५५% वाढ नोंदवली आहे. ग्राहकांनी शोरूमच्या सेवेबद्दल संतोष व्यक्त करत सांगितले की, सणाच्या दिवशी गाडी विकत घेणे सोपे आणि आनंददायी झाले. ऑफर्स तसेच कर्मचारी सेवा अत्यंत कौतुकास्पद आहेत

शोरूमने सणाच्या निमित्ताने केलेल्या या विक्री मोहिमेत स्थानीय ग्राहकांपासून शहरभरातील खरेदीदार सहभागी झाले, ज्यामुळे गुढीपाडवा निमित्ताचा उत्साह दुप्पट झाला.

# हिंदी चित्रपटातील विरह गीतांचा २१ मार्च रोजी खास कार्यक्रम

नगर – '९०'s टॉकीज' आणि 'ऑरेंज इव्हेंट्स' यांच्या संयुक्त विद्यमाने हिंदी चित्रपटातील सेन्टीमेंटल व विरह गीतांचा (दर्दभरे नगमे) विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम २१ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता सावेडी येथील रावसाहेब पटवर्धन स्मारक, समर्थ शाळेसमोर आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात ९० च्या दशकातील अविस्मरणीय व हृदयस्पर्शी गीतांचा सुरेल आस्वाद रसिकांना घेता येणार आहे. विशेष म्हणजे हा कार्यक्रम सर्वांसाठी पूर्णतः मोफत ठेवण्यात आला आहे. नागरिकांनी उपस्थित राहून या सुरेल कार्यक्रमाचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

माहितीसाठी जालिंदर शिंदे (मो. ९८८१७२५६९६) तसेच ॲड. सचिन चंदनशिव (मो. ८७९६८६५४८५).

# अहिल्यानगरमध्ये २७ मार्चला 'निधी आपके निकट' कार्यक्रम

नगर – निवृत्तीवेतनधारक तसेच कंपनीचे नियोक्ते आणि प्रतिनिधी यांच्यासाठी 'निधी आपके निकट' हा विशेष कार्यक्रम २७ मार्च रोजी सकाळी ९.३० वाजता गंगाधर गुणे आयुर्वेदिक कॉलेज, विश्रामबाग, माळीवाडा अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आला आहे.

भविष्यनिर्वाह निधीशी संबंधित कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक किंवा प्रशासनिक अडचणी असल्यास आवश्यक कागदपत्रांसह या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन कर्मचारी भविष्य निधी संघटनेचे सहायक भविष्य निधी आयुक्त यांनी केले आहे.



गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर एमआयडीसी येथील श्री सालासर ह्युंदाई शोरूममध्ये वाहन विक्रीत अभूतपूर्व वाढ नोंदवली गेली.

# 'श्री सालासर ह्युंदाई शोरूम'मध्ये गुढीपाडव्याला गाड्यांची अभूतपूर्व विक्री

नगर – गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर एमआयडीसी येथील श्री सालासर ह्युंदाई शोरूम मध्ये वाहन विक्रीत अभूतपूर्व वाढ नोंदवली गेली. या सणासुदीच्या काळात ग्राहकांचा उत्साह पाहून शोरूममध्ये एक उत्सवाचे वातावरण निर्माण झाले. शोरूममध्ये या दिवशी नवीन वाहन खरेदीसाठी ग्राहकांनी प्रतिसाद दिला.

विविध मॉडेल्सवर दिल्या जाणाऱ्या आकर्षक सवलती, फाइनान्सिंगच्या सोयी आणि ग्राहकांना मिळणारी उत्कृष्ट सेवा यामुळे विक्रीत विक्रमी उच्चांक झाला. व्यवस्थापनाने सांगितले की, गुढीपाडवा हा सण नवीन सुरुवातीसाठी आणि शुभेच्छा देण्यासाठी खूप महत्त्वाचा असतो. या काळात ग्राहकांचा ओढ पाहून आम्हाला अत्यंत आनंद झाला.

सणाच्या या दिवशी, शोरूममध्ये विविध वाहन मॉडेल्सचे लाइव्ह प्रदर्शनही झाले, ज्यामुळे ग्राहकांना त्यांच्या गरजेनुसार वाहन निवडण्याची संधी मिळाली. नवीन वर्षाच्या सुरुवातीला ग्राहकांचा उत्साह आणि शोरूमची विक्री यामुळे श्री सालासर ह्युंदाई शोरूमने विक्रीचा उच्चांक गाठला आहे.

शोरूमच्या व्यवस्थापनाने सर्व ग्राहकांचे आभार मानले असून, भविष्यातही आम्ही उच्च दर्जाची सेवा आणि ग्राहकांना आकर्षक योजना उपलब्ध करून देऊ, असे आश्वासन दिले.

# 'आनंदऋषीजी हॉस्पिटल' आरोग्यसेवेतून माणुसकी धर्म जपत आहे

## डॉ. प्रतिक कटारिया यांचे प्रतिपादन, श्वसन विकार मोफत तपासणी शिबिराला रुग्णांचा प्रतिसाद; ७५ रुग्णांची तपासणी

नगर – आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या माध्यमातून आरोग्यसेवेतून माणुसकी धर्म जपला जात आहे. येणाऱ्या रुग्णांकडे माणुसकीच्या भावनेने पाहून त्याच्या जीवनातील वेदना दूर करण्याचे काम हे आरोग्य मंदिर करत आहे. देवाच्या कृपेने या आरोग्य सेवेच्या कार्यात कटारिया परिवाराची दुसरी पिढी देखील डॉक्टरच्या रुपाने जोडली गेली आहे. या सेवा कार्यात योगदान देत असल्याचा संपूर्ण परिवाराला अभिमान असल्याचे डॉ. प्रतिक कटारिया यांनी सांगितले.



आनंदऋषीजी हॉस्पिटल अँण्ड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषिजी म.सा. यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित श्वसन विकार मोफत तपासणी शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी डॉ. प्रतिक कटारिया आदी.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल अँण्ड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषिजी म.सा. यांच्या ३४ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित श्वसन विकार मोफत तपासणी शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी डॉ. प्रतिक कटारिया बोलत होते. यावेळी डॉ. वसंत कटारिया, डॉ. अनिकेत कटारिया, लता कटारिया, प्रज्ञा कटारिया, हर्षदा कटारिया, मनीष लोढा, संतोष बोथरा, सतीश लोढा, डॉ. प्रकाश कांकरिया, मानकचंद कटारिया, प्रकाश छल्लाणी, सुभाष मुनोत, श्वसन विकार तज्ञ डॉ. स्नेहा तिरपुडे व डॉ. प्रणाली त्रिमुखे आदी उपस्थित होते.

डॉ. स्नेहा तिरपुडे व डॉ. प्रणाली त्रिमुखे यांनी फुफ्सांचे आजार विषयी उपचार पद्धती, दमाबद्दल समाजात गैरसमज यावर मार्गदर्शन केले. ते म्हणाल्या की, कोविडनंतर फुफ्सांच्या आजाराची जागृती झाली, मात्र उपचाराची योग्य माहिती पोहोचली नाही. हे आजार बरे होतात, मात्र योग्य वेळी उपचार व निदान आवश्यक असल्याचे स्पष्ट करुन हॉस्पिटलमध्ये असलेल्या आरोग्य सुविधांची माहिती त्यांनी दिली.

प्रज्ञा कटारिया म्हणाल्या की, आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या माध्यमातून लाखो रुग्ण लाभ घेतात. सुपर स्पेशलिटी डॉक्टर २४ तास उपलब्ध असतात. २५ वर्षापासून आचार्यजींच्या आशीर्वादाने ही सेवा सुरू आहे. जैन सोशल फेडरेशन मानवतेच्या कार्यात मोठे योगदान देत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शिबिरात श्वसन विकार संबंधीत फुफ्साचे आजार, दमा, खोकला, ॲलर्जी इत्यादीसंबंधीत ७५ रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली. सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले. प्रकाश छल्लाणी यांनी आभार मानले.

# अहिल्यानगर येथील वैभव घासे आणि महेश ढेपे यांचे 'आयआयटी'मध्ये यश



नगर – अहिल्यानगर शहरातील वैभव विजय घासे आणि महेश दत्तात्रय ढेपे या दोन विद्यार्थ्यांनी आयआयटी प्रवेश परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत शिक्षण घेत असतानाही त्यांनी देशपातळीवर मानाचे स्थान मिळवले असून त्यांच्या या यशामुळे संपूर्ण जिल्ह्याचा अभिमान उंचावला आहे.

वैभव यांनी इकॉनॉमिक्स शाखेत ऑल इंडिया रँक ३४४ मिळवत आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. स्पर्धात्मक परीक्षांमध्ये इतका उच्च क्रमांक मिळवणे ही मोठी कामगिरी मानली जाते.

दुसरीकडे महेश यांनी केमिस्ट्रीमध्ये ऑल इंडिया रँक ८८३ तसेच बायोटेक्नॉलॉजीमध्ये २००१ क्रमांक मिळवत आपले स्थान पक्के केले आहे. या दोन्ही विद्यार्थ्यांनी मर्यादित साधनसामग्रीतूनही अभ्यासावर लक्ष केंद्रित करत यशाचा मार्ग निवडला.

या दोन्ही विद्यार्थ्यांची कौटुंबिक परिस्थिती अत्यंत साधी असून अनेक अडचणींचा सामना करत त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. घरची आर्थिक परिस्थिती बेताची असतानाही त्यांनी कोणतीही सबब न देता सातत्याने अभ्यास केला. अनेक वेळा आवश्यक सुविधा उपलब्ध नसतानाही त्यांनी ध्येय डोळ्यासमोर ठेवून अविरत परिश्रम घेतले. त्यांच्या पालकांनीही प्रतिकूल परिस्थितीत मुलांच्या शिक्षणासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत त्यांना पाठबळ दिले.

चि. वैभव आणि चि. महेश यांच्या या यशाने हे स्पष्ट केले आहे की, परिस्थिती कितीही कठीण असली तरी जिद्द, मेहनत आणि योग्य दिशा असल्यास यश नक्की मिळते. त्यांच्या या यशामुळे भविष्यात आणखी विद्यार्थी मोठी स्वप्ने पाहण्यास आणि ती पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्यास प्रेरित होतील. हे यश माझ्या प्रतिकूल परिस्थितीत प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष मदत करणाऱ्या आणि परिवारातील सदस्यांना सर्मपित. असा विश्वास विजय घासे यांनी व्यक्त केला आहे.

# राष्ट्रीय पातळीवर मीराज स्कूल, नगरचा गौरव; सौ. मीरा बारस्कर यांना 'भारत भूषण सन्मान'

नगर – चित्रकूट इंटरनॅशनल स्कूलतर्फे आयोजित 'भारत भूषण सन्मान २.०' या राष्ट्रीय स्तरावरील सोहळ्यात देशभरातील १७५ प्राचार्यांचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमात भिस्तबाग व बोल्हेगाव परिसरातील मीराज स्कूलच्या संचालिका व मुख्याध्यापिका सौ. मीरा बारस्कर यांना त्यांच्या उत्कृष्ट व नाविन्यपूर्ण शैक्षणिक कार्याबद्दल 'भारत भूषण सन्मान' प्रदान करण्यात आला.



भिस्तबाग व बोल्हेगाव परिसरातील मीराज स्कूलच्या संचालिका व मुख्याध्यापिका सौ. मीरा बारस्कर यांना त्यांच्या उत्कृष्ट व नाविन्यपूर्ण शैक्षणिक कार्याबद्दल 'भारत भूषण सन्मान' प्रदान करण्यात आला.

गेल्या ११ वर्षांपासून शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या सौ. मीरा बारस्कर यांनी आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित अध्यापन, ई-लर्निंग व डिजिटल साधनांचा प्रभावी वापर करत विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणला आहे. मूल्याधारित शिक्षणपद्धतीसोबतच विद्यार्थी केंद्रित उपक्रमांमुळे त्यांनी शाळेची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मीराज स्कूलने अल्पावधीतच गुणवत्तापूर्ण, संस्कारक्षम व आधुनिक शिक्षण देणारी विश्वासार्ह संस्था म्हणून परिसरात नावलौकिक मिळवला आहे. शाळेच्या वैशिष्ट्यांमध्ये इंटर-स्कूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांमध्ये सक्रिय सहभाग, राष्ट्रीय स्तरावरील ऑलिंपियाड व स्पर्धा परीक्षांची तयारी, अनुभवी शिक्षकवर्ग, तसेच कला, क्रीडा व व्यक्तिमत्व विकासासाठी विशेष उपक्रमांचा समावेश आहे. याशिवाय कराटे व तायक्वांदो प्रशिक्षण सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आली आहे.

भिस्तबाग, बोल्हेगाव तसेच परिसरातील विविध भागांतून सुरक्षित व विश्वासार्ह बस सुविधा उपलब्ध असल्याने पालकांसाठीही शाळेत प्रवेश घेणे अधिक सोयीचे झाले आहे. सुरक्षित, शिस्तबद्ध व सकारात्मक शैक्षणिक वातावरण ही शाळेची आणखी एक जमेची बाजू आहे.




श्री सांदिपनी अकॅडमी व इस्कॉन मंदिर यांच्या सहभागाने गुढीपाडव्यानिमित्त निघालेल्या चैत्र शोभायात्रेत विद्यार्थी.

# गुढीपाडवा निमित्त चैत्र शोभायात्रेत विद्यार्थ्यांचा जल्लोष; श्री सांदिपनी अकॅडमी आणि इस्कॉन मंदिराचा सहभाग

नगर – गुढीपाडव्याच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या चैत्र शोभायात्रेत शहरातील विद्यार्थ्यांचा उत्साह ओसंडून वाहताना दिसला. रेडिओ सिटी ९१.१ एफएम यांच्या आयोजनाखाली व श्री सांदिपनी अकॅडमी यांच्या मुख्य प्रायोजकत्वाखाली ही शोभायात्रा पार पडली.

या यात्रेची सुरुवात प्रोफेसर चौक येथून झाली. इस्कॉन मंदिर तसेच श्री सांदिपनी अकॅडमीच्या विद्यार्थिनी व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. विशेषतः महिला विद्यार्थिनींनी विविध पारंपरिक वेशभूषा परिधान करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

यावेळी अकॅडमीचे संचालक के. बालराजू, राहुल गुजराल, नानासाहेब बारहाते यांच्यासह अकॅडमीचे कर्मचारी, स्टाफ व विद्यार्थी उपस्थित होते. ढोल-ताशांच्या गजरात, सांस्कृतिक सादरीकरणांनी व रंगीबेरंगी वेशभूषेमुळे वातावरण उत्साहपूर्ण झाले होते. नागरिकांनीही उपस्थित राहून या यात्रेला प्रतिसाद दिला. ही शोभायात्रा पारिजात चौक येथे उत्साहात झाली. एकात्मता, संस्कृती आणि परंपरेचा संदेश देणारी ही मिरवणूक नागरिकांच्या स्मरणात राहणारी ठरली.

# ज्येष्ठ नागरिकांसाठी 'विवाह सोहळा एक उत्सव' 'दुसरे बालपण स्पर्धेचे आयोजन

नगर – मानकन्हैय्या ट्रस्ट व्दारे दरवर्षी खास ज्येष्ठ नागरिकांसाठी 'दुसरे बालपण' स्पर्धेचे आयोजन केले जाते. ज्येष्ठ नागरिकांच्या कला गुणांना उजाळा मिळावा तसेच विरंगुळा, मनोरंजन व आनंदाचा ठेवा त्यांना यातून गवसावा यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात येते, अशी माहिती संयोजिका व ट्रस्टच्या कार्याध्यक्षा डॉ. सुधा कांकरिया यांनी दिली.

दर वर्षी वेगवेगळी थीम (विषय) देऊन सदर स्पर्धा घेतल्या जातात. यंदाचे हे तिसरे वर्ष असून 'विवाह सोहळा-एक उत्सव' या विषयावर स्पर्धा होणार आहेत, सदर स्पर्धेसाठी वयोमर्यादा वय वर्षे ५० च्या पुढे असून प्रवेश अर्ज भरण्याची अंतिम तारीख ४ मे आहे. सदर स्पर्धा २४ मे रोजी होणार आहेत. व्यक्तींनी सहभागी व्हावे असे आवाहन ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. प्रकाश कांकरिया यांनी केले आहे.

'दुसरे बालपण स्पर्धा २०२६' मध्ये सहभागी होण्यासाठी संहिता सहित नावनोंदणी करणे आवश्यक आहे. 'विवाह सोहळा-एक उत्सव' या विषयावर सादरीकरण करताना नाटिका, नृत्यनाटय, अशा प्रकारे सादरीकरण करायचे आहे. त्यात कमीत कमी ४ कलाकार व जास्तीत जास्त १२ कलाकारांना सहभागी होता येईल. सादरीकरणाचा कालावधी कमीत कमी ८ मिनीटे व जास्तीत जास्त १२ मिनीटांपर्यंतचा असेल असे संयोजन समितीच्यावतीने कळविण्यात येत आहे. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी पी डी कुलकर्णी, चंद्रकांत पालवे, सदाशिव मोहिते, नंदकुमार देशपांडे, प्रशांत कटके, जयंत येलूलकर, प्रसाद बेडेकर, चंद्रकांत पंडित, प्रिया सोनटक्के, रामदास केदार, दिपक शिरसुल हे परिश्रम घेत आहेत. माहितीसाठी व प्रवेश अर्जासाठी साई सूर्य नेत्रसेवा, माणिक चौक, अहिल्यानगर फोन नंबर ९८५०८८७८३८ येथे संपर्क करावा.

# नगरमध्ये २२ मार्चला विराट हिंदू संमेलन व कलश शोभायात्रा

## रामगिरीजी महाराज यांची प्रमुख उपस्थिती



नगर – माळीवाडा व टिळक रोड परिसरातील नागरिकांच्या वतीने २२ मार्च सायं. ४ वाजता रोजी विराट हिंदू संमेलन व कलश शोभायात्रेचे आयोजन माळीवाडा येथील रुपीबाई मोतिलालजी बोरा मैदान, अहिल्यानगर या ठिकाणी करण्यात आले आहे.


या विराट हिंदू संमेलनामध्ये मार्गदर्शन करण्यासाठी श्री क्षेत्र सरलाबेटचे महंत रामगिरी महाराज व सुशांत प्रवीण पांडकर (रा.स्व. संघ नाशिक विभाग प्रचारक) प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

या यात्रेत महिलांनी डोक्यावर कलश घेवून शोभायात्रेत सामील व्हावे.

तसेच परिसरातील नागरिकांनी या संमेलनात उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. संमेलनानंतर महाप्रसादाची व्यवस्था केली आहे.

# रमजान ईद नंतर नगर शहरातून सुफी संत ख्वाजा गरीब नवाज दर्शन यात्रेचे आयोजन

## २७ मार्च रोजी नगर शहरातून अजमेरला जाणार, भाविकांना लाभ घेण्याचे आवाहन



नगर – रमजान ईद नंतर शहरातून २७ मार्च रोजी सुफी संत ख्वाजा मोइनुद्दीन हसन चिश्ती (गरीब नवाज) यांच्या दर्शन यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. अजमेर (राजस्थान) ला जाण्यासाठी शहरातून कौटुंबिक धार्मिक यात्रेची संधी भाविकांना उपलब्ध होणार असून, हे ७ दिवसीय यात्रेचे नियोजन करण्यात आले आहे. यानंतर देखील एप्रिल, मे व जून महिन्यात या यात्रेचे नियोजन करण्यात आले असल्याची माहिती यात्रेचे समन्वयक फजल शेख यांनी दिली.

शहरातून थेट अजमेरला जाण्यासाठी रेल्वे अथवा खासगी वाहनांची पुरेशी सुविधा नसल्याने शहरातून विशेष खासगी लक्झरी (स्लिपर) बसने जाण्याची सोय करण्यात आलेली आहे. २७ मार्च रोजी ही दर्शन यात्रा शहरातून निघणार असून, याचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या यात्रेत अजमेर शरीफ, शरवाड शरीफ, टाटोटी शरीफ, कपासन शरीफ, चितोड गड, जावरा, चाळीस गाव, धुलिया येथील धार्मिक स्थळांना भेट दिली जाणार आहे.

या यात्रेत भाविकांची नाश्ता, जेवण, राहण्याची व्यवस्था अल्पखर्चात सेवाभावाने करण्यात आली आहे.

या यात्रेत प्रथम नोंदणी करणाऱ्यांना प्राधान्य राहणार असल्याने अधिक माहिती व नोंदणीसाठी ८०८७७४२८१८ या नंबरवर संपर्क साधण्याचे सांगण्यात आले आहे.

# रमजान ईद निमित्त ईदगाह मैदान येथे नागरिकांच्या सोयीसुविधा व सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक व्यवस्था तातडीने करण्यात यावी

नगर – रमजान ईद निमित्त शहरातील ईदगाह मैदान येथे नमाज अदा करण्यासाठी येणाऱ्या नागरिकांच्या सोयीसुविधा व सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक व्यवस्था तातडीने करण्यात यावी, अशी मागणी अलतमश जरीवाला यांनी केली आहे.

२१ मार्च रोजी रमजान ईद उत्साहात साजरी होणार असून, दरवर्षीप्रमाणे हजारो मुस्लिम बांधव ईदगाह मैदान येथे एकत्र येऊन सकाळी १० वाजता नमाज अदा करतात. मात्र सकाळी ८ वाजल्यापासून वाढत्या उन्हामुळे विशेषतः ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांना त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे उष्माघात व इतर आरोग्य समस्या उद्भवण्याची शक्यता लक्षात घेता प्रशासनाने योग्य उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे जरीवाला यांनी नमूद केले आहे.



अलतमश जरीवाला

या पार्श्वभूमीवर ईदगाह मैदानावर मोठ्या प्रमाणात अच्छादित शामियाना उभारणे, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, आरोग्य मदत कक्ष सुरू करणे, आवश्यक वैद्यकीय कर्मचारी व औषधसाठा उपलब्ध ठेवणे, तसेच आपत्कालीन परिस्थितीसाठी रुग्णवाहिका सज्ज ठेवणे, अशा विविध सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. यासोबतच परिसरात स्वच्छता व्यवस्था व इतर मूलभूत सुविधा पुरविण्याचीही मागणी करण्यात आली आहे.

ईद हा सौहार्द, बंधुभाव आणि एकतेचा सण असल्यामुळे मोठ्या संख्येने नागरिक एकत्र येतात. त्यामुळे कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी अहिल्यानगर महानगरपालिका प्रशासनाने तातडीने योग्य नियोजन करून वरील सर्व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी अलतमश जरीवाला यांनी केली आहे.



मध्यपूर्वेत कोणत्याही ठोस कारणाशिवाय युद्ध लादल्याचा आरोप करत जागतिक मानवसमाजाच्या वतीने अहिल्यानगर येथे तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले.

# अमेरिका-इस्त्राईलविरोधात 'निषेध आंदोलन; ट्रम्प व नेतन्याहू यांच्या प्रतिमांना जोडे मारो

## जगाला तिसऱ्या महायुद्धाकडे ढकलण्याचा आरोप; शांततेसाठी पुढाकार घेण्याचे आवाहन

नगर – मध्यपूर्वेत कोणत्याही ठोस कारणाशिवाय युद्ध लादल्याचा आरोप करत जागतिक मानवसमाजाच्या वतीने अहिल्यानगर येथे तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले. दिल्लीगेट परिसरात पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदेच्या पुढाकाराने अमेरिका आणि इज्राईल या राष्ट्रांविरोधात घोषणाबाजी करत निदर्शने करण्यात आली.

आंदोलनादरम्यान आंदोलकांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इस्त्राईलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांच्या प्रतिमांना जोडे मारून त्या पायाखाली तुडवत संताप व्यक्त केला. ट्रम्प मुर्दाबाद, नेतन्याहू मुर्दाबाद, भारत माता की जय आणि वंदे मातरम अशा घोषणा देण्यात आल्या.

या आंदोलनात ॲड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, प्रकाश थोरात, ॲड. अमित थोरात, वीरबहाद्दूर प्रजापती, सचिन कुक्कडवाल, संतोष खामकर, ओम कदम, पोपट शेळके, ॲड. लक्ष्मणराव पोकळे, पोपट भोसले, धनंजय मडके, कैलास पठारे, अशोक भोसले आदी नागरिक, कार्यकर्ते आणि विविध संघटनांचे पदाधिकारी सहभागी झाले होते.

# अहिल्यानगर सीए शाखा व आयकर विभाग आयोजित आयकर तरतुदींवरील जनजागृती कार्यक्रमास प्रतिसाद

नगर – अहिल्यानगर सीए शाखा, संयुक्त आयकर आयुक्त (Exemption) विभाग, छत्रपती संभाजीनगर तसेच धर्मदाय आयुक्त कार्यालय, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयकर कायद्यातील अलीकडील बदल व ट्रस्ट संदर्भातील तरतुदींवर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रतिसाद मिळाला.



अहिल्यानगर सीए शाखा, संयुक्त आयकर आयुक्त विभाग, छत्रपती संभाजीनगर तसेच धर्मदाय आयुक्त कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयकर कायद्यातील अलीकडील बदल व ट्रस्ट संदर्भातील तरतुदींवर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमामध्ये तज्ज्ञांनी विविध आयकर तरतुदींविषयी सोप्या आणि समजण्यासारख्या भाषेत मार्गदर्शन केले. संयुक्त आयकर आयुक्त मुकुल कुलकर्णी व आयकर अधिकारी गोपाल गायकवाड यांनी ट्रस्टची मूलभूत संकल्पना, नोंदणी प्रक्रिया व कार्यपद्धती याबाबत सविस्तर माहिती दिली. त्यांनी ट्रस्टच्या पारदर्शक कारभाराचे महत्त्व अधोरेखित केले.

सहाय्यक धर्मादाय आयुक्त विशाल शेंडे यांनी ट्रस्ट कायद्याविषयी मार्गदर्शन करताना आवश्यक कागदपत्रे वेळेत सादर करण्याचे महत्त्व स्पष्ट केले. तसेच विश्वस्तांमध्ये वाद टाळून संस्थेचे काम सुरळीत ठेवण्याचे आवाहन केले.

सीए प्रसाद भंडारी यांनी आयकर कायदा २०२५ मधील नव्या दुरुस्त्यांचा आढावा घेत, त्यांचा ट्रस्टवर होणारा परिणाम स्पष्ट केला तसेच इतर नवीन बदल सांगितले.

संयुक्त आयकर आयुक्त एकनाथ अभंग यांनी नवीन आयकर कायद्याशी संबंधित महत्त्वाच्या प्रकरणांचा (case laws) संदर्भ देत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

यावेळी सीए शाखेचे अध्यक्ष सीए अभयकुमार कटारिया यांनी सांगितले की, या उपक्रमाचा मुख्य उद्देश ट्रस्ट संबंधित आयकर नियमांविषयी स्पष्टता निर्माण करणे व सर्वसामान्य नागरिक तसेच संस्थांना योग्य मार्गदर्शन मिळवून देणे हा आहे. माहितीच्या अभावामुळे अनेकदा चुका होऊन आर्थिक नुकसान होऊ शकते; अशा कार्यक्रमांमुळे ही समस्या कमी करण्यास मदत होईल, असे त्यांनी नमूद केले. पुढे ते म्हणाले की, या मार्गदर्शनाचा लाभ ट्रस्ट व्यवस्थापक, सामाजिक संस्था, सनदी लेखापाल, कर सल्लागार, वकील व सामान्य नागरिकांना होऊन पारदर्शकता आणि कायदेशीर पालन वाढीस लागेल. भविष्यातही अशा प्रकारचे जनजागृती कार्यक्रम नियमितपणे आयोजित करण्यात येणार असून अधिकाधिक लोकांपर्यंत ही माहिती पोहोचवण्याचा प्रयत्न केला जाईल.

या कार्यक्रमास अहिल्यानगर सीए शाखेचे माजी अध्यक्ष, पदाधिकारी, विविध संस्थांचे प्रतिनिधी व अधिकारी, कर सल्लागार, सनदी लेखापाल, वकील तसेच नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सीए अभयकुमार कटारिया यांनी केले. सूत्रसंचालन सीए सुनंदा रच्चा यांनी केले, तर आभार प्रदर्शन सचिव सीए महेश भळगट यांनी केले. यावेळी उपाध्यक्ष सीए महेश तिवारी, कार्यकारणी सदस्य सीए काजल चंदे, माजी अध्यक्ष सीए प्रसाद पुराणिक तसेच सर्व माजी अध्यक्ष उपस्थित होते.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## क्षणार्धात बनणार फोटोचा व्हिडिओ

जगातील सर्वांत श्रीमंत व्यक्ती एलन मस्क यांनी नुकतीच एक्स प्लॅटफफॉर्मवर एक मजेशीर पोस्ट शेअर केली. जी काही क्षणांतच व्हायरल खूपच व्हायरल झाली. आता फोटोला व्हिडीओत रूपांतरित करणं अगदी सोपं झालंय, असं त्याने यावेळी सांगितलं. फक्त फोटोवर थोडा जास्त वेळ बोट दाबा म्हणजेच लाँग प्रेस करा आणि तो तत्काळ व्हिडीओत रूपांतरित होईल, असे मस्क यांनी आपल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले आहे.

मस्क यांनी याची माहिती देणारा एक छोटासा व्हिडीओही अपलोड केला आहे. ज्याने सोशल मीडियावर धुमाकूळ घातला. ही खास सुविधा त्यांच्या अख कंपनीच्या ग्रोक एआय चॅटबॉटशी जोडलेली आहे. ज्यामुळे सामान्य लोकांना क्रिएटिव्ह कामं करणं सोपं होईल. मस्क यांच्या या निर्णयाने तंत्रज्ञान क्षेत्रात मोठी चर्चेची ठिणगी पेटलीय. कारण, आता कोणालाही महागड्या सॉफ्टवेअरची गरज भासणार नाही. ही प्रक्रिया अतिशय साधी आहे. एखादी इमेज घ्या, त्यावर लाँग प्रेस करा, मग ती इमेज व्हिडीओत बदलेल. त्यानंतर तुम्ही स्वतःचा प्रॉम्प्ट (सूचना) देऊन व्हिडीओला पर्सनल टच देऊ शकता, मस्क यांनी सांगितले. उदाहरणार्थ, मस्क यांनी स्वतःचा प्रॉम्प्ट वापरून एक जोडप्याच्या फोटोला मजेदार मॅपेटस् (पपेटस्) सारखं हलणाऱ्या व्हिडीओत रूपांतरित केलं. यात ॲनिमेशनचीही जोड होते, ज्यामुळे स्थिर फोटो



जिवंत वाटू लागतो. ही सुविधा ग्रोकच्या विस्तारत्या क्रिएटिव्ह साधनांमधील एक भाग आहे, ज्यात लेखन, इमेज तयार करणं आणि रिअल-टाइम डेटा वापरणं यासारख्या गोष्टींचा समावेश आहे. तज्ज्ञांच्या मते, ही एआय-आधारित टूल सामान्य यूजर्ससाठी क्रांतिकारी पाऊल ठरेल.

कारण, यातून काही सेकंदांतच व्यावसायिक दर्जाचा व्हिडीओ तयार होतो. ग्रोक ही अख ची लेटेस्ट एआय निर्मिती आहे, जी एलन मस्क यांच्या दृष्टीतून तयार झाली. या फीचरमुळे यूजर्स फोटो अपलोड करून त्यात हालचाल, संवाद किंवा कथा जोडू शकतात. मस्क यांच्या पोस्टनंतर अनेकांनी हे ट्राय करून स्वतःचे व्हिडीओ तयार केले आणि शेअर केले, ज्यामुळे #GrokVideo सारखे ट्रेंड सुरू झाले. ही सुविधा फक्त मजेसाठी नाही, तर शिक्षण, मार्केटिंग किंवा सोशल मीडिया कंटेंटसाठीही उपयुक्त ठरेल. मस्क यांनी हा व्हिडीओ ग्रोक वापरूनच तयार केला असल्याचं सांगितलं, ज्याने 'एआय' च्या सर्जनशीलतेवर विश्वास वाढवला. 'हे फीचर 'एआय?' ला लोकांच्या हातात आणणारं आहे, ज्यामुळे क्रिएटिव्हिटी प्रत्येकासाठी उपलब्ध होईल,' असे एका तंत्र तज्ज्ञाने म्हटलंय. 'एआय' ने नुकतेच ग्रोक ४ ची सेवा जगभरातील सर्व यूजर्ससाठी मोफत जाहीर केली आहे.


याचा अर्थ, कोणालाही पैसे न देता हे 'एआय' वापरता येईल. हे एक्स प्लॅटफफॉर्मवरून, तसेच आयओएस आणि अँड्रॉइड ॲपद्वारे उपलब्ध आहे. भारतातही हे सहज डाऊनलोड करता येईल, ज्यामुळे लाखो भारतीय वापरकर्त्यांना फायदा होईल. मस्कच्या कंपनीने यापूर्वीही ग्रोकला विकिपीडियासारख्या प्लॅटफफॉर्मला टक्कर देणाऱ्या 'ग्रोकिपेडिया' सारख्या योजना जाहीर केल्या होत्या; पण हे नवीन फीचर त्यातलं सर्वात मजेदार आहे.

## किरणोत्सर्गी केंद्रकातील चुंबकत्वाची उकल

शास्त्रज्ञांनी प्रथमच एका दुर्मीळ रेणूचा अभ्यास करून, एका किरणोत्सर्गी केंद्रकात चुंबकत्व कसे वितरित होते, हे पाहिले आहे. सामान्यतः, निसर्गाचे नियम बदलत नाहीत. तुम्ही सिएटलमध्ये चेंडू फेकला किंवा टोकियोमध्ये, तो तसाच खाली पडतो. भौतिकशास्त्रज्ञ याला 'समरूपता' म्हणतात आणि विश्वाने कसे वागावे यासाठी ते समरूपतेचा मार्गदर्शक म्हणून उपयोग करतात. यामुळेच जग सुसंगत राहते. जर भौतिकशास्त्राचे नियम दर मंगळवारी वेगळे राहिले, तर विश्वात अराजकता निर्माण होईल. परंतु, निसर्गाचे काही भाग या परिपूर्ण संतुलनाचे पालन करताना दिसत नाहीत. उदाहरणार्थ, विश्वाने द्रव्य (मॅटर) आणि प्रतिद्रव्य (अँटिमॅटर) यांना समान मानले पाहिजे, असे मानणे योग्य वाटेल. तरीही, आपले विश्व जवळजवळ पूर्णपणे द्रव्यापासून बनलेले आहे आणि शास्त्रज्ञांना अजूनही याचे कारण माहीत नाही.

या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी किरणोत्सर्गी केंद्रके हे एक आश्वासक ठिकाण आहे. कारण, प्रोटॉन आणि न्यूट्रॉनची विषम मांडणी समरूपतेतील अगदी लहान तुटफफूट देखील वाढवू शकते. एमआयटीचे ( MIT) भौतिकशास्त्रज्ञ आणि या घटनेवरील नवीन अभ्यासाचे सह-लेखक सिल्विउ-मारियन उद्रेस्कू यांच्या मते, शास्त्रज्ञ जर त्या लहान असममितता शोधू शकले, तर ते स्टँडर्ड मॉडेलच्या पलीकडील नवीन भौतिकशास्त्र उघड करू शकते.

'सायन्स' जर्नलमध्ये २३ ऑक्टोबर रोजी प्रकाशित झालेल्या एका अभ्यासात, सर्न




आणि एमआयटी येथील शास्त्रज्ञांनी रेडियम मोनोफ्लोराईड नावाच्या अल्पायुषी किरणोत्सर्गी रेणूच्या ऊर्जा स्पेक्ट्रमचे मापन करण्यासाठी तपासणी केली.

परंतु, आश्चर्याची गोष्ट म्हणजे, त्यांनी अखेरीस या रेणूच्या एका केंद्रकात चुंबकत्व कसे वितरित होते याचे प्रथम निरीक्षण केले. या घटनेला 'बोहर-वेसकॉप इफेक्ट' म्हणून ओळखले जाते, आणि रेणूत ही घटना यापूर्वी कधीही पाहिली गेली नव्हती. ठरऋ रेणू दोन अणूंनी बनलेला आहे: रेडियम आणि फ्लोराईड. प्रत्येकाचे स्वतःचे केंद्रक आहे. रेडियम केंद्रकामध्ये 'ऑक्टोपोल डिफफॉर्मेशन' नावाचा गुणधर्म आहे. 'तुम्ही कल्पना करू शकता की केंद्रकाचा आकार पेअर किंवा एवोकॅडोसारखा आहे,' असे एमआयटीचे भौतिकशास्त्रज्ञ आणि अभ्यासाचे पहिले लेखक शेन विल्किन्स यांनी सांगितले. या असममित आकारांमुळे, ठरऋ हे शास्त्रज्ञ शोधत असलेल्या असममितता शोधण्यासाठी एक परिपूर्ण उमेदवार ठरले.

## शोध 'पहिल्या' रेडिओ सिग्नलचा

खगोलशास्त्रज्ञांनी 'ॲटलस' (3 I/ ATLAS) या आंतरतारकीय धूमकेतूमधून येणारा पहिला-वहिला 'रेडिओ सिग्नल' शोधला आहे. हा धूमकेतू सूर्यमालेतील त्याच्या एकमार्गी प्रवासाचा निम्मा टप्पा ओलांडत असतानाच हे सिग्नल मिळाले आहेत. हा शोध धूमकेतूच्या तथाकथित एलियन (परग्रहवासी) उत्पत्तीचा स्पष्ट पुरावा असल्यासारखे वाटू शकते; पण प्रत्यक्षात हे त्याचे अगदी उलट आहे. हा पूर्णपणे नैसर्गिक धूमकेतू आहे.

'ॲटलस' हा आपल्या विश्वाच्या परिसरातून जाणारा तिसरा ज्ञात आंतरतारकीय वस्तू आहे. तो जुलै महिन्याच्या सुरुवातीला पहिल्यांदा दिसला होता, तेव्हा तो ताशी २,१०,००० किमीपेक्षा जास्त वेगाने सूर्याकडे धावत होता. मे महिन्यापर्यंतचे त्याचे निरीक्षण नंतर उघडकीस आले आहेत. बहुतेक संशोधकांचे मत आहे की, हा एक धूमकेतू आहे, जो कदाचित



आतापर्यंतचा सर्वात जुना धूमकेतू असू शकतो. जवळपास ७ अब्ज वर्षांपूर्वी आकाशगंगेच्या 'सीमावर्ती' भागातील एका अन्य सौरमालेतून तो बाहेर फेकला गेला असावा.

हा आंतरतारकीय पाहुणा सापडल्यापासून, हार्वर्ड विद्यापीठाचे खगोलभौतिकशास्त्रज्ञ आणि प्रसिद्ध एलियन-शिकारी अवि लोएब यांच्या नेतृत्वाखालील शास्त्रज्ञांच्या एका लहान गटाने एक अपुष्ट सिद्धांत मांडला आहे. त्यांच्या मते, हा धूमकेतू प्रत्यक्षात वेषांतर केलेले एलियन स्पेसक्राफ्ट आहे. यामुळे धूमकेतूबद्दल अनेक दिशाभूल करणाऱ्या बातम्या पसरल्या आहेत, ज्यामुळे 'आंतरतारकीय वस्तूं' (आयएसओ)च्या सभोवतालच्या खऱ्या विज्ञानापासून लक्ष विचलित होते, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. (यापूर्वी प्रथम सापडलेला खडज, 'ओउमुमुआ' यालाही लोएब आणि इतरांनी संभाव्य एलियन मदरशिप म्हटले होते.) याच पार्श्वभूमीवर, दक्षिण आफ्रिकेतील मीरकॅट रेडिओ दुर्बिणीच्या खगोलशास्त्रज्ञांनी नुकतीच 'ॲटलस'मधून पहिल्या रेडिओ उत्सर्जनाची घोषणा केली, तेव्हा लोएबच्या सिद्धांताच्या समर्थकांना कदाचित काही गुप्त एलियन संदेशाचा पुरावा मिळेल अशी अपेक्षा होती.

विशेषतः, हे उत्सर्जन २९ ऑक्टोबर रोजी धूमकेतूच्या सूर्याजवळच्या सर्वात जवळच्या स्थितीशी जुळणारे होते. त्याऐवजी, हे सिग्नल धूमकेतूच्या 'कोमा' (धूमकेतूच्या सभोवतालचा वायू आणि धूळ यांचा ढग) मध्ये हायड्रॉक्सिल रॅडिकल्स किंवा जक रेणू यांच्या उपस्थितीमुळे होणाऱ्या विशिष्ट तरंगलांबी शोषणाचे (wavelength absorption) परिणाम आहेत. २०१६ च्या अभ्यासानुसार, धूमकेतूच्या 'बाहेर पडण्याच्या' या नैसर्गिक प्रक्रियेद्वारे पाण्याचे रेणू बाहेर फेकले जातात आणि त्यांचे विघटन होऊन हे रॅडिकल्स तयार होतात. ही धूमकेतूच्या क्रियेची एक स्पष्ट खूण आहे. ऑक्टोबरच्या सुरुवातीस, 'नासा' च्या संशोधकांना 'ॲटलस' मधून 'फायर नोजलप्रमाणे' वेगाने पाणी बाहेर पडताना दिसले होते. परंतु, या ताज्या निष्कर्षांवरून असे दिसून येते की, सूर्याजवळ असताना, या पाण्याचे सौर किरणोत्सर्गामुळे विघटन होत आहे, जसे अपेक्षित होते.

## प्राचीन काळातील कवटी शस्त्रक्रिया उपकरण


पोलंडमधील पुरातत्त्वशास्त्रज्ञांना मध्य-पूर्वेकडील माझोविया भागातील वाइसा गोरा नावाच्या केल्टिक स्थळावर एक दुर्मीळ लोखंडी उपकरण सापडले आहे. हे उपकरण केल्टस नावाच्या जमातीचे लोक २,३०० वर्षांपूर्वी कवटीची शस्त्रक्रिया करण्यासाठी वापरत असत. ही हाताने वापरण्याचा कलाकृती-वस्तू वाइसा गोरा येथे सापडली.



व्हर्साय येथील राज्य पुरातत्त्व संग्रहालयातील पुरातत्त्वशास्त्रज्ञ बार्टलोमी काचिन्स्की यांनी सांगितले की, 'या लोखंडी वस्तूच्या निर्मितीचे तंत्र आणि अचूकता केल्टिक धातूशास्त्राचे सूचक आहे,' आणि तिचा वापर मानवी कवटीला छिद्र पाडण्यासाठी केला जाण्याची शक्यता आहे. 'बोअर करणे' या ग्रीक शब्दावरून आलेली 'ट्रेपनेशन' ही कवटीच्या शस्त्रक्रियेची एक पद्धत आहे, जी जगभरातील अनेक संस्कृतींमध्ये (उदा. स्पेन, इस्रायल आणि बोलिव्हिया) किमान ५,००० वर्षांपासून १९ व्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत प्रचलित होती. एका २००७ च्या अभ्यासानुसार, बहुतेक केल्टसब 'पारंपरिक घासून छिद्र पाडण्याचे तंत्र' वापरत होते, तर काही केल्टिक वसाहती 'ड्रिल ट्रेपनेशन्स' करत होत्या. काचिन्स्की यांच्या मते, 'कबरीत सापडलेल्या वैयक्तिक साधनांवरून हे स्पष्ट होते की केल्टसब ट्रेपनेशन करत होते. असे दिसते की, या शस्त्रक्रिया केवळ जादुईच नव्हे, तर वैद्यकीय उद्देशांसाठीही केल्या जात होत्या.' केल्ट्स हे मूळचे युरोपियन भूभागावरील क्रूर योद्धे होते, ज्यांनी रोम शहर लुटले होते. वाइसा गोरा हे युरोपमध्ये सापडलेले सर्वात ईशान्येकडील केल्टिक स्थळ असल्यामुळे या ठिकाणी त्यांची उपस्थिती आढळणे पुरातत्त्व टीमसाठी थोडे आश्चर्यकारक होते. या ठिकाणी ट्रेपनेशन शस्त्रक्रिया केलेल्या लोकांचे कोणतेही सांगाडे अद्याप सापडलेले नाहीत. काचिन्स्की आणि त्यांच्या टीमने गेल्या दोन वर्षांपासून वाइसा गोरा येथे उत्खनन केले, ज्याची सुरुवात १९७० च्या दशकात झाली होती. पुरातत्त्वशास्त्रज्ञांना शेकडो कलाकृती सापडल्या, ज्यात पातळ कांस्य पत्र्यापासून बनवलेले दुर्मीळ केल्टिक शिरस्त्राण देखील होते. टीमला केल्टिक ब्रोचेस, एक भाला आणि एक लोखंडी कुऱ्हाड तसेच घोडेस्वारीशी संबंधित अनेक धातूच्या वस्तू सापडल्या. या वसंत ऋतूमध्ये शिरस्त्राण सापडलेल्या जागेतच हे ट्रेपनेशन उपकरण सापडले. काचिन्स्की यांच्या मते, हे उपकरण शिरस्त्राणापेक्षाही दुर्मीळ आहे. कारण, केल्टिक स्थळांवर अशी शस्त्रक्रिया उपकरणे क्वचितच सापडली आहेत. या विशिष्ट साधनाला एक टोकदार पाते आहे जे टोकात बदलते आणि ते कदाचित मूळतः लाकडी हँडलला जोडलेले असावे. हे एक प्रकारचे प्राचीन शस्त्रक्रिया ब्लेड आहे.

## विश्वाचा 'सिटी-साईज' नकाशा !

संशोधकांच्या मते, ३,००० वर्षांपूर्वीचे एक माया स्थळ खरं तर 'विश्वाची व्यवस्था' दर्शवणारा एक प्रचंड, शहराच्या आकाराचा नकाशा आहे. आग्नेय मेक्सिकोमध्ये असलेले हे अवशेष 'कॉस्मोग्राम' म्हणजेच प्राचीन लोकांनी विश्वाकडे कसे पाहिले याचे प्रतिनिधित्व करणारे चित्रण होते, असे एका नवीन अभ्यासात सूचित करण्यात आले आहे.



अगुअडा फेनिक्स म्हणून ओळखले जाणारे हे स्थळ 'माया क्षेत्रातील सर्वात प्राचीन आणि सर्वात मोठी स्मारक वास्तुकला' आहे आणि मेसोअमेरिका मधील अनेक प्राचीन शहरांपेक्षा मोठे आहे, असे संशोधकांनी अभ्यासात नमूद केले आहे. या वास्तूचे बांधकाम एक मोठे कार्य असले, तरी त्याचे सांस्कृतिक महत्त्व लोकांना यात सहभागी होण्यास प्रवृत्त करणारे ठरले असावे. याचा अर्थ, बांधकामासाठी मजुरांना जबरदस्तीने आणले गेले नसावे, असे संशोधकांचे मत आहे. ब्रिटनमध्ये स्टोनहेंज बांधले गेले असावे, अगदी त्याचप्रमाणे अगुअडा फेनिक्सचे बांधकाम हे प्राचीन लोकांसाठी एक सामूहिक आणि आनंदाचा उत्सव ठरला असावा. संशोधकांनी पुढे लिहिले आहे, 'मोठे बांधकाम कार्यक्रम आणि सामूहिक विधींमध्ये मेजवान्या, वेगवेगळ्या गटांमध्ये वस्तूंची देवाणघेवाण आणि जीवनसाथी भेटण्याची संधी देखील समाविष्ट असू शकते, ज्यामुळे लोकांना एकत्र येण्यासाठी अतिरिक्त प्रेरणा मिळाली असावी.' हा नवीन अभ्यास बुधवारी (५ नोव्हेंबर) 'सायन्स ॲडव्हान्सेस' जर्नलमध्ये प्रकाशित झाला आहे. अगुआडा फेनिक्सची निर्मिती इ.स.पूर्व १०५० मध्ये झाली, जी माया संस्कृतीने लेखन प्रणाली विकसित करण्यापूर्वीची आहे. त्यामुळे या स्थळाचे कोणतेही लिखित रेकॉर्ड उपलब्ध नाहीत. सुमारे इ.स. पूर्व ७०० च्या आसपास हे स्थळ सोडून दिले गेले. २०२० ते २०२४ दरम्यान शास्त्रज्ञांनी या स्थळाबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी संशोधन केले. त्यांनी उत्खननासोबतच लिडार तंत्रज्ञानाचा वापर केला, ज्यामध्ये विमानातून लेझरचे स्पंद सोडले जातात आणि परावर्तित प्रकाशाचे मोजमाप करून भूभागाची प्रतिमा तयार केली जाते. त्यांच्या विश्लेषणानुसार, कालवे, रस्ते आणि धरण यांसारख्या संरचनांच्या प्रणालीचा वापर करून हा कॉस्मोग्राम तयार केला गेला. या संरचना एकमेकांना छेदून क्रॉसचे आकार तयार करतात. या कॉस्मोग्रामचा आकार ५.६ बाय ४.७ मैल (९ बाय ७.५ किलोमीटर) असून तो 'नंतरच्या मेसोअमेरिकन शहरे जसे की टिकल आणि टेओटिहुआकन यांच्या तुलनेत मोठा किंवा त्याहूनही अधिक आहे,' असे टीमने त्यांच्या शोधनिबंधात नमूद केले आहे.

## स्ट्रोक शस्त्रक्रियेतही आता रोबोंची कमाल

स्कॉटलंड आणि अमेरिकेतील डॉक्टरांनी रोबोचा वापर असलेली जगातील पहिली स्ट्रोक शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. ही प्रक्रिया रिमोट थ्रॉम्बेक्टॉमी म्हणून ओळखली जाते, ज्यामध्ये स्ट्रोकनंतर मेंदूतील रक्ताच्या गुठळ्या काढल्या जातात.




डंडी विद्यापीठाच्या प्रोफेसर आयरीस ग्रुनवाल्ड यांनी वैद्यकीय विज्ञानासाठी दान केलेल्या मानवी मृतदेहावर ही 'रिमोट थ्रॉम्बेक्टॉमी' प्रक्रिया केली. प्रोफेसर गुनवाल्ड डंडीमधील नाइनवेल्स हॉस्पिटलमध्ये होत्या, तर ज्या मृतदेहावर त्या रोबोटिक मशिन वापरून शस्त्रक्रिया करत होत्या, तो मृतदेह विद्यापीठाच्या दुसऱ्या सुविधेत होता. यानंतर काही तासांतच, फ्लोरिडामधील न्यूरोसर्जन रिकार्डो हॅनेल यांनी हे तंत्रज्ञान वापरून पहिली ट्रान्सअटलांटिक (खंडांतर्गत) शस्त्रक्रिया पार पाडली. हॅनेल जॅक्सनविले येथील त्यांच्या बेसवरून, ४,००० मैल (६,४०० किमी) दूर डंडीमध्ये ठेवलेल्या मानवी मृतदेहावर यशस्वीरीत्या ऑपरेट केले. रुग्णांवर उपयोगासाठी ही प्रणाली मंजूर झाल्यास हा एक संभाव्य 'गेम चेंजर' (परिस्थिती बदलणारा) ठरू शकतो, असे टीमचे मत आहे. या वैद्यकीय तज्ज्ञांचा विश्वास आहे की, हे तंत्रज्ञान स्ट्रोकच्या उपचारांची पद्धत बदलू शकते. कारण, विशेष उपचारांपर्यंत पोहोचायला होणाऱ्या विलंबामुळे रुग्णांच्या बरे होण्याची शक्यता कमी होते. प्रोफेसर गुनवाल्ड म्हणाल्या, 'आम्ही भविष्याची पहिली झलक पाहत आहोत, असे वाटले. जिथे यापूर्वी या गोष्टी विज्ञान कथा मानल्या जात होत्या, तिथे आम्ही दाखवून दिले की, प्रक्रियेचा प्रत्येक टप्पा आता शक्य आहे.' डंडी विद्यापीठ हे वर्ल्ड फेडरेशन फॉर इंटरव्हेंशनल स्ट्रोक ट्रीटमेंटचे जागतिक प्रशिक्षण केंद्र आहे. रक्तवाहिन्यांमध्ये मानवी रक्तासारखे द्रव फिरवले जाते, अशा मृतदेहांवर डॉक्टरांना शस्त्रक्रिया करण्याची सुविधा यूकेमध्ये केवळ याच ठिकाणी उपलब्ध आहे. प्रोफेसर ग्रुनवाल्ड पुढे म्हणाल्या, 'वास्तविक मानवी शरीरात संपूर्ण यांत्रिक थ्रॉम्बेक्टॉमी प्रक्रिया शक्य आहे हे दाखवण्यासाठी आम्ही ही प्रक्रिया प्रथमच करू शकलो.

## मेंदूविषयीच्या समजांना नवे वळण

तरुणपणी मेंदू तीक्ष्ण असतो, असे म्हटले जाते. तसेच 'साठी आणि बुद्धी नाठी' अशीही एक म्हण आपल्याकडे आहे; पण हे काही खरे नाही! आजवर आपण सतत ऐकत आलो आहोत की, वेगाने शिकण्याची आणि विचार करण्याची क्षमता फक्त तारुण्यापर्यंतच मर्यादित असते आणि जसजसे वय वाढते, तसतशी आपली बुद्धी कमकुवत होऊ लागते. परंतु, आता विज्ञानाच्या दुनियेतून या विचाराला एक धक्का देणारा 'यूटर्न' मिळाला आहे. युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलियाच्या ताज्या अभ्यासाने या जुन्या समजुतीला पूर्णपणे बदलून टाकले आहे. या अभ्यासाचा निष्कर्ष आश्चर्यकारक आहे: तुमचा मेंदू २५ वर्षांच्या नाही, तर ५५ ते ६० वर्षांच्या दरम्यान आपल्या सर्वोत्तम कार्यक्षमतेवर पोहोचतो.

'जर्नल इंटेलिजन्स' मध्ये प्रकाशित झालेल्या या नवीन संशोधनानुसार, जसजसे आपले वय वाढते, तसतसे आपला मेंदू केवळ अनुभव गोळा करत नाही, तर तो त्यांना चांगल्या प्रकारे समजून घेतो आणि योग्य निर्णय घेण्यासाठी त्यांचा वापर करतो. तरुण लोकांमध्ये त्वरित प्रतिक्रिया देण्याची क्षमता असली, तरी ४०-५० वर्षांनंतर विचार करण्याची पद्धत अधिक शांत, समजूतदार आणि अचूक होते. शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे की, शरीराची सर्वात जास्त ताकद २५ ते ३५ वर्षांच्या दरम्यान असते; पण खरा समजूतदारपणा, अनुभव आणि चांगले निर्णय घेण्याची शक्ती ५५ वर्षांनंतर दिसून येते. या वयात लोक केवळ भावनांवर नव्हे, तर पक्क्या अनुभवावर आणि ठोस विचारांवर आधारित निर्णय घेतात. मनोवैज्ञानिकांनुसार, ५५ वर्षांपर्यंत व्यक्तीकडे भरपूर अनुभव जमा झालेला असतो. त्याने अपयशातून खूप काही शिकलेले असते आणि त्याला



समाजाची चांगली समज असते. या सर्व गोष्टी एकत्र आल्याने, त्यांच्या विचार करण्याची पद्धत सुधारते आणि त्यांचे निर्णय अधिक खोलवरचे असतात. म्हणूनच या वयाचे लोक कठीण परिस्थितीतही शांत राहतात आणि घाईगडबडीत कोणताही निर्णय घेत नाहीत. बऱ्याचदा असे मानले जाते की, वाढत्या वयानुसार स्मरणशक्ती कमी होते; पण सत्य हे आहे की, मेंदू वेगळ्या पद्धतीने काम करू लागतो. तो आता केवळ गोष्टी लक्षात ठेवण्याऐवजी, त्यांना समजून घेण्यावर आणि त्यांची जोडणी करण्यावर अधिक भर देतो. याचा अर्थ विचार करण्याची पद्धत बदलते; पण समजूतदारपणा कमी होत नाही. ५० वर्षांनंतर व्यक्तीने जीवनातील अनेक चढ-उतार पाहिलेले असतात. नाती, काम आणि समाज याबद्दलचे अनुभव त्याच्या निर्णयांना अधिक व्यावहारिक आणि टिकाऊ बनवतात. त्यामुळे या वयात घेतलेले निर्णय दूरदृष्टीचे सिद्ध होतात. हा अभ्यास सांगतो की, वय वाढणे ही कोणतीही कमतरता नसून, ती एक नैसर्गिक प्रगती आहे. तरुणांमध्ये ऊर्जा असते, तर प्रौढ वयात व्यक्तीकडे ज्ञान आणि विवेक यांचे अद्भुत मिश्रण असते. त्यामुळे, पुढच्या वेळी कोणी तुम्हाला 'आता तुमचे वय झाले आहे' असे म्हटल्यास, तुम्ही हसून उत्तर देऊ शकता... 'होय, आता तर माझा मेंदू माझ्या सर्वात उत्कृष्ट टप्प्यात आहे!'

